सहामाही ,, ३ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ...........०१

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ..., 8 as
Single copy ................. 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXI AKOLA MONDAY 7 JUNE 1897 NO 22

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख ७ माहे जून सन १८९७ इ० अंक २२



### जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवांनें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६.
R. Aitken
Agent


### नोटीस

रा. रा. पुंजाजी वलद हिराजी उगले माळी राहणार पातुरशेखबाबू तालुके बाळापूर यांस—

खालीं सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यांत येतें कीं, तुह्माकडे माझ्य मालकीचें 'नायकवाडी' नांवाचें शेत नफ्यानें आहे. तुमच्याशीं माझें पटत नाहीं. मला तुह्मी विश्वासुक वाटत नाहीं. आणि तुमचीही चिठी मला आली होती कीं तुह्मी शेत वाहण्यास नाखुष आहां तथापि मेहबतीखातर मी तें शेत वहितीसाठीं तुह्माकडेच नफ्यानें ठेवलें होतें. तुह्मा गुदस्त सालचे रुपये देण्यास मोठी खळखळ केली आणि अखेरीस नफ्याच्या रकमेपैकीं शिलकी येणें राहिलेल्या २९ रुपयाचा दस्तऐवज तुह्माकडून करून घ्यावा लागला. तुमच्या घरीं मी उतरलों होतों तेव्हां माझ्या भोळेपणानें माझे महत्वाचे कागद तुमच्या घरीं गहाळ झालें तुह्मी शेती संबंधानें नेहमीं दंडेलीचीं उत्तरें देतां आणि सदर्हू शेत वाहण्याचें स्वतां सोडीत नाहीं व दुसऱ्यास वाहूं देत नाहीं.

तुमची भलाई आतां मला नको. मला शेत कधी नफ्याच्या लागवणीनें ठेवणें नाहीं दुसऱ्या कुळास मी आपलें शेत लावून फाडण्यासाठीं तुमच्या गांवीं गेल्या बुधवारीं आलों होतों तर तुह्मी माझा अपमान केला आणि शेत सोडूनच देत नाहीं अशा लपेटीच्या बाता सांगू लागला:

सन १३०७ फसली साला साठीं तुह्मी शेताची कष्टमशागत केली आहे ह्मणून तें शेत तुह्मास वाहणें असल्यास वायद्याच्या रकमे सबेत तुह्मास १०० शंभर रुपये द्यावे लागतील. नाहींतर, तारीख १२ जूनच्या आंत शेत खालीं करून द्यावें, आणि चार पंच सांगतील ती रकम शेताच्या झालेल्या मेहतान्याबद्दल मी देण्यास तयार आहे. तारीख १२ जूनच्या तारखेपर्यंत ही अखेरची व्यवस्था न करितां मेहतान्याची रकम तुह्मी ठरविली नाहीं तर १०० रुपये १३०७ फसली सालाबद्दल द्यावयाचा करार तुह्मास कबूल आहे असें समजून पुढील सरकारी पहिल्या वायद्याच्या तारखेपर्यंत तुमच्याकडील १०० रुपयाची वाट पाहीन आणि त्या मुदतींत रकम पटली नाहीं तर या रकमेसुद्धां आणि नोटिशीच्या व इतर खर्चासुद्धां सर्व पैसा कोर्टमार्फत वसूल करून घेऊन शेत ही कोर्टमार्फतच ताब्यात घेतलें जाईल कळावें तारीख २ जून सन १८९७ ई०

सही
वंकार अय्या गुरू रामलिंग अय्या संस्थान मठ बाळापूर दस्तुर खुद्द.

---

रा. रा वऱ्हाड समाचार कर्ते—यांस
वि. वि.

मि. बुगूबक्ष व त्यांचे चिरंजीव असे दोन पंजाबी हकीम येथें आले आहेत. ते मूळ व्याधीवर उत्तम औषध देतात. त्यांनीं मला बरें केलें. त्याची हकीकत अगदीं थोडक्यांत देतों.

मी आज नऊ वर्षें रक्त मूळ व्याधीनें आजारी होतो. मला १८८८ सालीं कांहीं दिवस शौच्यास साफ न होतां त्या वेळीं रक्त पडूं लागलें. पुढें कांहीं दिवसांनीं कांहीं औषधें घेऊन गुण आला. पुढें वर्ष सहा महिन्यांनीं पुन्हा असेंच होत असे. १८९१ सालीं तीन महिने आजारी होतो गुदस्ता मुंबईस सेकंड एल. एल. बीची टर्म भरीत असतांना फारच आजारी झालों. व त्या पायीं त्या परीक्षेचा अभ्यास सोडून द्यावा लागला. कारण अशा स्थितींत मुंबईस राहणें शक्य नव्हतें. मुंबईचे प्रख्यात डॉक्टर देशमुख यांनीं आलटून पालटून एक औषधाची यादी मला दिली. तिनें मला निदान तिसरे दिवशीं चांगला गुण वाटत असे. वऱ्हाडांत आल्यापासून ११ महिन्यांत मी त्या औषधाचा २।३ वेळां गुण घेतला. परंतु तारीख २३ एप्रील रोजीं जी कांहीं प्रकृती बिघडली ती कांहीं केल्या सावरेना. चौद दिवस रोज ४००।४५० थेंब रक्ताचे पडत असत. मोजून पाहिलें. डा० देशमुखांचे औषध तर घेतच होतों. पण दुसरीही कित्येक औषधें घेतलीं. पायखान्यांतून बाहेर चालत येण्या पुरतीही शक्ति राहिली नाहीं. पुढें जिवाचा धडा करून हकीमांचे औषध येथील एक सद्गृहस्थ डा० कोल्हटकर यांचे विचारानें घेण्याचें ठरविलें. तारीख ७ मे रोजीं हकिमानीं शौचाहून आल्याबरोबर त्या वेळीं मात्र बाहेर येणाऱ्या दोन मोडांस सुईनें ओवून सुताच्या दोरीनें घट्ट बांधलें. त्यास इंग्रजी शस्त्र प्रयोगांत लिगेचर हें नांव आहे. पुढें तीन दिवस मला बराच त्रास झाला. दुसऱ्याचे मदतीवांचून हालतांही येत नव्हतें. हकीम मात्र रोज सकाळीं येऊन थोडें औषध लावून जात. नंतर चार दिवस दुःखाचे जागीं पहिले तीन दिवसाप्रमाणेंच वारंवार शेक देऊन आणखी सांजाही बांधावा लागत होता. पुढें चार दिवस शिऱ्याचे ऐवजीं दहिभात बांधावा लागे शेवटीं ११ वे दिवशीं ते बांधलेले मोड दोरीसह गळून पडले. तोंपर्यंत हकीम रोज एकवेळ औषध लावून जात. त्याच दिवशीं हकीम परगांवीं गेले: ते आठवडाभर परत आलेच नाहींत. ते दिवस फुकट गेले. गेल्या रविवारीं येथें आल्याबरोबर त्यांनीं फारच शिताफीचें काम केलें. तें हें कीं दुःखाची जागा बाभळीच्या सालीं शिजविलेल्या पाण्याचे बोळ्यानें बराच वेळ शेकली चेपली. व एक बारीक चिमटा घेऊन आधीच गळून पडलेल्या मोडांचीं मुळें माझे भावाचे हातूनच मला अगदीं इजा न देतां, बाहेर ओढून काढलीं. त्या दिवशींच मला बसतां व चालतां येऊं लागलें, व त्याच दिवसा पासून शौचाचे वेळीं आज १०।११ वर्षें आंत बाहेर येत असे तें येण्याचें बंद झालें. रक्त तर पहिल्याच दिवशीं बंद झालें.

गळून पडलेले मोड चुकून फेकून दिले गेले. त्यांची मुळें मात्र मी स्पिरीटमध्यें घालून ठेविली आहेत. हीं मुळें सरासरी १ इंच लांब असून त्यांस लहान मोठ्या बऱ्याच फांद्या आहेत व अगदीं एखाद्या लहान रोपट्याच्या मुळा प्रमाणें दिसतात.

हें पत्र प्रसिद्धी करितां पाठविण्याचा उद्देश इतकाच कीं मजसारख्या गरजू लोकांनीं ही संधी घालवूं नये. ह्या हकीमा जवळ खानदशाचे असि. कलेक्टर पेन साहेबांचें सर्टिफिकेट आहे दुसरी आणखीही बरीच आहेत. त्यांनीं नुकतेच अंदाऱ्याचे खुशालराव देशमुख व त्यांचे चिरंजीव व जळगांवचे देशपांडे व आणखी कांहीं जणास वऱ्हाडांत बरें केलें आहे. येथें बोहोरी आळींत उतरले आहेत. कळावे लोभ करावा ही विनंती.

अकोला, शनिवार
ता॥ २९ मे १८९७
आपला दत्तात्रय त्रिंबक भावे. असि. मास्तर हायस्कूल अकोला.

हें पत्र वऱ्हाडांतील दुसरे पत्रकार जर एकवेळ घेतील तर लोकांवर बरेच उपकार होतील असें वाटतें.

ता. क.

पहिले दिवसा पासूनच मला कांहीं पथ्य नव्हतें. गेल्या आठवड्यांत मुद्दाम लसणीचें, सांडग्या मिरच्यांचें तिखट, तेलकट जिनस, सांग्याची भाजी वगैरे जिनसा मी खाऊन पाहिल्या त्यामुळें मला कांहीं विकृती झाली नाहीं.

### ELEGY ON THYRZA

And thou art dead, as young and fair
As aught of mortal birth;
And forms so soft and charms so rare
Too soon return'd to Earth!
Though Earth received them in her bed.
And o'er the spot the crowd may tread
In carelessness or mirth,
There is an eye which could not brook
A moment on that grave to look.

I will not ask where thou liest low
Nor gaze upon the spot;
There flowers or weeds at will may grow
So I behold them not;
It is enough for me to prove
That what I loved and long must love
Like common earth can rot;
To me there needs no stone to tell
'Tis Nothing that I loved so well.

Yet did I love thee to the last,
As fervently as thou
Who didst not change through all the past
And canst not alter now.
The love where Death has set his seal
Nor age can chill, nor rival steal,
Nor falsehood disavow;
And, what were worse, thou canst not see
Or wrong, or change, or fault in me.

The better days of life were ours;
The worst can be but mine;
The sun that cheers, the storm that lours
Shall never more be thine.
The silence of that dreamless sleep
I envy now too much to weep;
Nor need I to repine.
That all those charms have pass'd away
I might have watch'd through long decay.

( To be continued )

### दुःखोद्गार

एकून सत्य मग ही जन किंवदंती।
'मेलीस तूं सहज—सद्गुण—रजयंती' ॥
हा मर्त्य लोक; इह नश्वर वस्तु सर्व।
सौंदर्यसार ललना परि तूं अपूर्व ॥१॥

ती लोचनाब्ज रुचि सौम्य विलासवापी।
तें मंदहास्य नवतेज मुखास ओपी ॥
तें दिव्यरूप; कनकापरि अंगयष्टि।
जातां अकालिं विलया मन होय कष्टि ॥२॥

त्या अस्थिनां तव जरी स्थल गर्भि भू दे।
हे त्यावरी जन जरी फिरती प्रमादें ॥
आहे परंतु जन एक जगांत जाणा।
ज्याला न तें स्थल मुहूर्तहि पाहवेना ॥३॥

'कोठें असे तव समाधि' 'कशी असे' ही।
पृच्छा नको मज; न दर्शन लोचनांहीं ॥
वाढो सुखें वनलता तदुपान्त भागीं।
मद्दृष्टि खास कधि त्या न पडेल जागीं ॥४॥

ज्या अंगनेवरि जडे स्थिर भावबंध।
जी जाहली सकळ जीवित-सार कंद ॥
गेलि ल्या इतर नश्वर वस्तुभी ती।

कार्य शेवटास जाऊन राष्ट्रीय सभेची राजकीय मोहिम यशश्रीनें सर्व देशास आनंदित करो अशी आमची परमेश्वरा पाशी प्रार्थना आहे.

राष्ट्रीय सभा विलायतेंत भरविण्याचा प्रश्न सोपा नाहीं. आठ दहा वर्षां नंतर या प्रश्नाचा निकाल सहजगतीनें फार अनुकूळ होत आहे ही गोष्ट आपल्या भावी राजकीय श्रीमंतीची खूण होय नामदार फेरोजशहा मेथा, प्रोफेसर गोखले, दिनशा वाचा, सुरेंद्रनाथ बानर्जी, सुब्रह्मण्यायर इत्यादि गृहस्थ ह्मणजे आमच्या देशाच्या अत्युत्तम थोर पुरुषांपैकीं श्रेष्ठ राष्ट्रभक्तांचा संतमेळाच होय. अशा लोकांच्या विद्वत्तेनें राष्ट्रीय विचारांचें दर्शन विलायतच्या लोकास उत्तम प्रकारें होईल ही मंडळी जी कृती करितील ती सर्व राष्ट्राची आहे असें मानण्यास काहीं हरकत नाहीं. विलायतेच्या सभेंत इंडियतील पुष्कळ नररत्नें असूं शकणार नाहींत ही गोष्ट कांहीं लघुपणाची नाहीं. विलायत या देशाहून सहस्रावधी मैल लांब आहे. हा प्रवास पुरा होण्याला पैशाच्या बाजूनें देखील मोठी नड आहे सार्वजनिक कार्यापुढें व्यक्तिमात्राच्या अडचणीला कांहींच किंमत नाहीं असा सिद्धान्त तात्विक दृष्ट्या खरा वाटला तरी व्यवहारिक दृष्ट्या सार्वजनिक कार्यासाठीं सुखत्याग व तनुमनधनाचें समर्पण या गोष्टी फार दुर्लभ व कष्टसाध्य आहेत. तेव्हां यंदाची सभा विलायतेस भरल्यानें आमचा बहुत वर्षांचा मनोरथ सफळ होईल आणि त्या योगानें आमच्या राजकीय उन्नतीला चांगली प्रगती मिळेल अशी आशा आहे. विलायतच्या सभेची गोष्ट सामान्य नाहीं तथापि जरूरीच्या मानानें या गोष्टी सारखी दुसरी फलदायी गोष्ट कोणतीच नव्हती. विलायतच्या लोकांस आमच्या राजकीय चळवळींस अनुकूळ करून त्यांस आमच्या हितकर्त्यांच्या व पुरस्कर्त्यांच्या श्रेणींत गोंववावें हाच हेतु सभा भरविण्याचा आहे. अप्रतिम राजनिष्ठा, उत्क्रमणाची प्रेरणा, व राज्यकर्त्यांशी एकजीव होण्याची उत्कट इच्छा हीं आमच्या राजकीय हालचालींचीं मूळ सूत्रें आहेत आणि त्यांच्या बळावर आह्मी ब्रिटिश प्रजेच्या नात्यानें महाराणी सरकारचें इंडियन राज्य चिरस्थायी, भक्कम व विजयशाली करूं आमच्या प्रगतीला उदारबुद्धीचे राज्यकर्ते मदत करितील अशा प्रकारें आह्मी राष्ट्रीय सभेच्या द्वारानें राज्यकर्त्यांच्याच नगरींत प्रयत्न योजिला आहे. मंगल प्रयत्नाला यशसंपदा हात जोडून वरतात तेव्हां या बळकट मंत्रावर आह्मी आपला व्यूह रचण्यास आरंभ केला आहे तो कालगतीनें शेवटास जाईल हें उघड आहे.

---

लंडनच्या राष्ट्रीय सभेविषयीं आह्मी किती आशाबद्ध होतो हें वरील लेखा वरून स्पष्ट होईल पण ब्रिटिश कांग्रेस कामिटीच्या पत्रावरून असें कळलें कीं हा राष्ट्रीय सभेचा योग सध्यातेस जात नाहीं. हा निराश मनाला खट्टू करणारा झाला तथापि वस्तुमाना पुढें मनुष्याचा इलाज नाहीं.

राष्ट्रीय सभा लंडनात भरत नाहीं तथापि ब्रिटिश कांग्रेस कमिटी गांवोगांव सभा भरविणार आहे आणि त्या सभांतून नामदार सुरेंद्रनाथ, प्रोफेसर गोखले, वाचा, सुब्रह्मण्यायर इत्यादि गृहस्थांचीं व्याख्यानें होतील. सर्व इंग्लडभर राष्ट्रीय सभेची चळवळ प्रसृत होईल अशा प्रकारचा जंगी प्रयत्न चालूं आहे. विलायतेस राष्ट्रीय सभा भरत नसल्या मुळें येत्या उमरावतीच्या सभेच्या कामाविषयीं लोकांनीं मोठ्या उत्साहानें झटलें पाहिजे.

---

नामदार सुरेंद्रनाथ बानरजी यांची साक्ष रायल कमिशना पुढें चालली असतांना त्यांनीं आपलीं मतें फार सुलभतेनें, हृदयंगम भाषाशैलीनें आणि मोठ्या गांभीर्यानें कळविलीं. कित्येक स्थळीं त्यांनीं चांगल्या गंमतीही केल्या आहेत. अद्याप सर्व साक्षीचा मजकूर आला नाहीं आणि जो अर्धवट आला आहे त्यांत पुष्कळ चुका असण्याचा मोठा संभव आहे. या शिवाय आंग्लो-इंडियन वर्तपत्रकर्त्यांचे रिपोर्टर देखील आपल्या कामांत अनेक वेळां कुचराई व छिद्रान्वेषण करित असताना रम्य व विचारणीय भागांचा लोप करितात. तथापि विलायतेस चाललेल्या साक्षी कडे आमचें लक्ष्य विशेष लागलें आहे ह्मणून वरील प्रकारच्या रिपोर्टावर कांहीं काल मनाची उत्कंठा संभाळावी लागते.

नामदार सुरेंद्रनाथ यांनीं खुलाशानें कळविलें कीं कामन्स सभेची एक कमिटी नेमण्यांत येऊन तिनें इंडियाच्या जमाखर्चा संबधानें चौकशी करावी आणि इंडिया सरकारास जमेचा व खर्चाचा ताळा बसविण्या विषयीं जबाबदार धरावें इंडिया सरकारावर स्टेट सेक्रेटरीचें इंडिया कौंसिल वरिष्ट आहे आणि या वरिष्ट कौंसिलास इंडिया सरकार हिशोब देत असतें. पण या वरिष्ट कौंसिलाचा अधिकार, दरारा व रवाब चांगलासा नाहीं ह्मणून कामन्स सभेच्या एका स्वतंत्र कमिटी कडे चौकशीचा अधिकार सोंपवावा.

सर आंड्रयू स्कोबल हे एक कमिशनर असल्या मुळें ते वारंवार मार्मिक प्रश्न करितात पण हे राष्ट्रीय सभेचे द्वेष्टे आहेत, त्या मुळें त्यांचे प्रश्न सरळपणाचे नसतात. नामदार सुरेंद्रनाथ ह्मणाले कीं ही कमिटी ह्मणजे मार्गदर्शक संस्था होय आणि ती आपले विचार वारवार कामन्स सभेला कळवीत जाईल. त्यावर सर स्कोबल ह्मणतात:— आतां जें काम ६२० सभासदांच्या हातीं आहे तें तुह्मी बाराजणाकडे सोपवूं इच्छिता काय? यावर ना० सुरद्रनाथ:— जें प्रत्येकाचें काम तें कोणाचेंच नव्हे. हा सिद्धान्त ऐकल्या बरोबर प्रश्नाची गती कुंठली.

इलाखे सरकारच्या जमाबंदी खर्चाच्या प्रकरणांत इंडिया सरकारानें वाटेल तेव्हां हात घालावा आणि इलाखा-सरकारचा अधिकार कमी करावा ही गोष्ट वाईट आहे. हल्लीं पंचवार्षिकी करार इंडिया सरकार इलाखासरकाराशी करितें पण त्या करारानें प्रांतिक-सरकारला कांहीं स्वतंत्रता रहात नाहीं, उपयुक्त व आवश्यक कामावर पैसा खर्चण्याची त्यांची स्वतंत्रता नाहींशी होते, आणि वरिष्ट सरकारच्या हुकुमाप्रमाणें वागावें लागतें. या विषयासंबधानें नामदार बानर्जी बोलले कीं इंडिया सारख्या विलक्षण राजकीय स्थितीच्या देशांत अंतस्थ स्थानिक सुधारणा अंमत महत्वाच्या व उपयोगाच्या आहेत आणि अशा देशांतील जमाखर्चाची पद्धती स्थानिक गोष्टीविषयीं बरोबर योजना करित नाहीं ह्मणून ती पद्धती अंमत चुकीची आहे. इंडिया सरकारचा खर्च अवाढव्य व अमर्याद आहे आणि लार्ड लान्स डैन व सर बाकनबरी यांच्या साक्षीवरून आमेंच लष्करी खातें आमच्या गरजेपेक्षां अधीक सामर्थ्यवान असून सरकारच्या परराष्ट्रीय प्रस्तुत राजकारणाला अनुकूळ असें आहे लष्करी खात्याचा खर्च हुंडणावळी खेरिज २३.४६ कोट रुपये आहे ह्मणजे हा खर्च सर्व ग्रेट ब्रिटना पेक्षां ६ कोटींनीं अधिक आहे आणि हा खर्च सव रूत देशाच्या लष्करी खर्च इतका असून शेंकडा ३२ या प्रमाणानें सर्व जमेच्या रकमेंतून खर्चला जातो.

मध्यंतरीं सर रालफ नाक्स ह्मणाले कीं:— इंडियाच्या सर्व लष्करा बद्दल पगार द्यावा लागतो आणि आम्ही खुद्द राष्ट्राचे साठीं लष्करी नोकरी फुकट करणाऱ्यांना इतर राष्ट्रांमध्यें कांहीं पगार मोजावा लागत नाहीं. असेंच नाहीं काय? नामदार बानर्जी ह्मणाले:— बरोबर आहे. आह्मी व्हालंटीअर बनण्यास तयार आहों पण आह्मास परवानगी नाहीं. जर इंडियन लोकांच्या व्हालंटिअर पलटणी बनविल्या तर हल्लींच्या प्रचंड लष्कराची जरूरच पडणार नाहीं.

बंगला इलाख्याच्या पोलिस खात्यांतील वरिष्ठ पदीच्या जाग्यावर परीक्षा घेऊन युरोपियन लोकांस नेमतात पण नेटिवांस परीक्षेला बसूं देत नाहीं यामुळें पोलीस खात्याचें काम वाईट चालतें, खर्च भारी पडतो आणि नेटिवांची अप्रतिष्ठा होते ही गोष्ट इतर खात्या ही सारखीच लागू पडते. सर्वत्र परकी लोकांनीं मोठमोठ्या हुद्याच्या जागा व्यापल्या आहेत. या विषयावर उहापोह चालला असतांना सर जेम्स पील मध्येंच ह्मणाले कीं प्रोफेसर बोस, व डाक्टर राय यांच्या सारख्यांस विलायतेंत सेट सेक्रेटरीनीं प्रोफेसर नेमिलें तर कांहीं अटकाव नाहीं. त्यावर नामदार सुरेंद्रनाथ ह्मणाले कीं खरोखर अशी गोष्ट घडेल तर मला फार आनंद होईल. पण अशी गोष्ट व्यवहारांत घडत नाहीं हें ध्यानात धरण्या सारखें आहे. अखेरीस त्या दिवशीं अध्यक्ष व नामदार सुरेंद्रनाथ यांच्या मताची एकरूपता झाली असें ठरलें कीं इंडियन लोकांस ब्रिटिश राज्य सुधारणाप्रिय वाटतें पण सध्या चालूं आहे त्या पेक्षां जलदीची सुधारणा पाहिजे आहे.

---

झालवार संस्थानाच्या महाराजांस पदच्युत केल्या नंतर तें संस्थान खालसा करण्यांत येईल असा पुष्कळांचा तर्क होता. पदच्युत राणा हा दाद मागत होता पण त्याच्या विषयीं जो वाईट ग्रह झाला तो कायमचा राहिला. खुद्द त्यांच्या संबंधानें अखेरीस पदभ्रष्टपणाचा कालिमा सततचा लागला. त्याची वर्तणूक असभ्य होती, त्याची कारकीर्द प्रजेला छळकारक होती, आणि त्याची लायकी पुन्हा गादीवर बसण्याची नाहीं असा पक्का ठराव सर्व इंग्रजी दरबारांतून झाला आणि सर्व दिशांनीं गादीच्या प्राप्तीची आशा विलयास गेली. झालवारच्या महाराजांचेंच दुर्भाग्य नाहीं तर सर्व इंडियनांचें दुर्दैव हें कीं महाराजांची भ्रष्टता व पतितपणा हीं शुद्धीकरणाच्या व पावनतेच्या संस्कारांच्या आटोक्या बाहेरची ठरलीं. महाराजांचें पूर्व वर्तन निंद्य होतें तथापि त्याचें परिमार्जन झालें नसतें असा ख्रिश्चियन राज्यकर्त्यांचा अभिप्राय खरोखर मनाला उद्वेग आणितो.

पदच्युत महाराजांस संतती नाहीं तेव्हां झालवार संस्थानाची दशा पुढें काय होईल या विषयीं पुष्कळांस गूढ प्रश्न पडला होता. पण दुःखात सुख इतकेंच कीं तें संस्थान खालिज न होतां तें कोटा संस्थानांत सामील करण्यांत येत आहे. इतिहासदृष्टीनें ही व्यवस्था बरी झाली. झालवार संस्थान कोठा संस्थानाचा एक भाग होता. सन १८१८ साली मांडीसोरचा तह झाला त्या वेळीं कोठा संस्थानाचे महाराज महाराव रामसिंग हे होते आणि त्यांचे दिवाण झालमसिंग नांवाचे गृहस्थ होते या दिवाणामुळें कोठा संस्थान भरभराटीस आलें, तें आपल्या प्रजानिष्टपणानें इंग्रज सरकारच्या कृपेस पात्र झालें आणि त्या मुळें कोठा संस्थानाचा नावलौकिक भागला वाढला. हे दिवाण मोठे मुत्सदी, धुरंधर व कार्यनिष्ठ होते. त्यांच्या कर्तबगारी बद्दल त्या गुणग्राही महाराजानें कंपनी सरकाराचा सल्ला घेऊन सन १८३८ साली कोठा संस्थानाच्या मुलखा पैकी झालवारचा मुलुख निराळ्या संस्थाना प्रमाणें तेडून दिला आणि तेव्हां पासून हें संस्थान झालमसिंगच्या वंशजा कडे चाललें होतें. पण अखेरीस अखेरच्या झालवसिंगानें गादी गमावली तेव्हां कोठा संस्थाना कडून त्या मुलखा बद्दल परत मागणी इंग्रजा कडे गेली. कोठा संस्थानाचें दैव मोठें कीं ही मागणी कबूल करण्यांत येऊन महाराणी सरकारच्या हिरादाणी कपिलाषष्ठीच्या आनंदोत्सवांत ही कृपा सफळ होणार आहे. झालवार संस्थानाचा योग्य प्रमाणें मूळच्या संस्थानांत समावेश झाला तथापि झालवारच्या दरबारी मंडळीचा योग्य परामर्ष घेतला जावा, त्यांस परकी संस्थनिकाच्या हातीं जावें लागूं नये आणि बहुत वर्षांचे हक्क व अधिकार कायमपणे चालावे ह्मणून चार महालांचे निराळेंच एक छोटेखानी संस्थान स्थापून त्याच्या गादीवर झालवारच्या राण्याच्या वंशजांतील योग्य वारसदार गादीवर बसवावा असा महाराणी सरकाचा संकल्प ठरला आहे. हे चार महाल मूळचे दिवाण झालमसिंग यांच्या कडे जहागिरी प्रमाणें होते. चार महालाचा मुलुख ह्मणजे पचपहार, आवर, डग व गंगार मिळून झालेला आहे हा पूर्वी होळकर सरकारा कडून कोठा संस्थानास मिळाला होता. या चार महालांत दिवाण साहेबांच्या खुद्द मालकीचा शहाबादचा भाग सामील करावयाचा होता पण तो जरा वेगळा पडल्यामुळें त्याच्या ऐवजीं कोठा संस्थानांतून झालरापट्टणाचा भाग तोडून घेतला; आणि चार महाल व झालरापट्टण मिळून एक नवीन संस्थान स्थापण्यांत येणार नाहीं.

इंग्रज सरकारानें झालवार संस्थान खालसा केलें नाहीं ही मोठी मेहेरबानी केली. तथापि पूर्वींचें संस्थान अजीबात मोडून एक निराळें संस्थास जुन्या संस्थानाचें स्मारक ह्म

णून चालू केलें. इंग्रजी अंमल कडक चालविला, नेटिव संस्थानिकांवर या उदाहरणानें दहशत बसविली आणि अप्रत्यक्षपणें नेटिव संस्थानांची स्वतंत्रता इंग्रजी कारस्थानसमुद्रांत बुडविली असें ह्मणणें भाग पडतें. खालसा मुलुखांतली प्रजा निःशस्त्र आहे आणि संस्थानें निःशस्त्र करण्या एवजीं त्यांस त्समुधारी बाहुल्या बनविल्या आहेत!

पुढील सोमवार व मंगळवार हे दोन दिवस राष्ट्रोत्सवाचे आहेत. इतिहासांत असा अपूर्व आनंदाचा समय आल्याचें वाचण्यांत नाहीं. पूर्वीच्या रामराज्या या युगांत दीर्घायुष्य ह्मणजे कांहीं नवलाची गोष्ट नव्हती आणि चिरकाल राज्य करण्याचा प्रसंग पूर्वी बहुत सूर्यवंशी, सोमवंशी इत्यादि राजांत आला होता अशा दंतकथा आहेत. पण अलिकडच्या मनूला ६० वर्षे राज्योपभोग ह्मणजे एक अद्भुत गोष्ट होय. पृथ्वीवर नऊ आश्चर्यकारक वस्तु आहेत अशी आख्यायिका आहे पण दहावें आश्चर्य हें कीं पृथ्वीवर इंग्रजी राज्य इतकें विस्तृत आहे कीं त्या राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं. या दहाव्या आश्चर्यपटावर राज्याभिषेक झाल्या पासून महाराणी व्हिक्टोरिया आज ६० वर्षे तिच्या प्रजाजनाला लाभल्या आहेत. हा खरोखर ईश्वरी अनुग्रह होय महाराणी सरकारच्या प्रजाजनाला हा सोन्याचा दिवस येत्या सोमवारीं उगवणार आहे आणि सोमवार व मंगळवार हे दोन दिवस राष्ट्रीय सणा प्रमाणें सर्वत्र आनंदांत घालविले जातील या आनंदोत्सासात आह्मा इंडियनांचा मोठा कार्यभाग आहे आणि तो कार्यभाग कोणता आहे हें कळण्या विषयीं सर्व राष्ट्र उत्कंठित आहे सरकारच्या रचना व योजना या सणा विषयीं काय काय आहेत हें आह्मास अजून कळलें नाहीं. प्रजाजन घरोघर गुढ्या उभारतील, सर्वत्र आनंद करितील व महाराणी व्हिक्टोरिआ यांस दीर्घायुष्य, आरोग्य, व वैभव हीं सदैव लाभोत ह्मणून परमेश्वरापाशीं हात जोडून वकिली करितील. ही गोष्ट प्रजेच्या बाजूची झाली. पण सरकार सुदीनस्मरणार्थ काय काय करणार आहेत हें ऐकण्या विषयीं इंडियन प्रजा फार उत्सुक आहे. महाराणी व्हिक्टोरिआ यांनीं प्रजावात्सल्यानें असा हुकूम फर्माविला आहे कीं वस्तुतःच्या दुष्काळांत इंडियन मरणोन्मुख व निराश झाले आहेत तथापि राजनिष्टेच्या लहरी मध्यें ते दीपोत्सव किंवा इतर ऐषआरामी करितील तर या गोष्टी न करविण्या विषयीं इंडिया सरकारनें काळजी घ्यावी. आनंद शिखरावर विराजमान असलेल्या महाराणी सरकारास भूतदयेची इतकी आठवण झाली हें ध्यानांत धरण्या सारखें आहे. पण ही भूतदया निष्कृतीची झाली. इला जर जोडगोळी कृतीची मिळेल तर महाराणी व्हिक्टोरिआची नामदुंदुभी चिरकाल परंपरेनें सर्वश्रुत होत जाईल. कृती ह्मणजे हल्लींच्या दुष्काळ समयीं अन्नदान, १८९७ सालच्या जाहिरनाम्या प्रमाणें एखादी इंडयनांच्या राजकीय हक्काची जाहिरपत्रिका इत्यादि गोष्टी संबंधानें घडली पाहिजे. याचना करणें प्रजाजनाचें काम आहे आणि ती सफळ करणें राज्यकर्त्यांच्या मर्जीवरचें आहे. सरकारी भूतदयेच्या कृतीचे परीक्षार्थ या सुवर्णसमारंभाला होणार आहे

महाराणी व्हिक्टोरिआ त्या सांकेतित दिवशीं विद्युत्संदेशानें एका निमिषमात्रांत राष्ट्रीय आनंदास प्रगती देतील आणि धन्यवाद, टाळ्यांचा गजर इत्यादिकांनीं सर्व आकाश एकदम दुमदुमेल अशी विलक्षण योजना या १९ व्या शतकाच्या अखेरच्या पंचवर्षांत निदर्शनास येणार आहे. येत्या सोमवारीं व मंगळवारीं काय काम चमत्कार होतील त्यांच्या कल्पनांनी सर्व इंडिया राष्ट्र ओतप्रोत भरलें आहे पण त्या कल्पनासृष्टीचा खरेपणा कितपत ठरतो हें पाहण्याचा काल समीप समीप येत आहे तसतसें मन आनंदोर्मीनें फार भरूं लागत आहे.

The Berar Samachar

MONDAY JUNE 14 1897

Famine extends fast in range and intensity. People succumb in large numbers to the worst extremes of scarcity and famine. The numbers on relief—works are daily growing; and the need of gratuitous relief is most keenly felt in many a circle of poverty—stricken families. Some who have lost strength for want of good nourishment will find it a hard problem to make a living in the immediate future. The helpless condition of the people is alarming and a saving hand of the Government will alone save the precious lives of the teeming millions of India. Liberal and comprehensive schemes of sustaining the lives of the masses should be set in motion. Poor—houses will have to be provided in numbers; many different centers of populations over and above 2 or 3 thousands of person will require poor—houses. Relief—works will have to be *localized*. The rainy season will deter many from moving about. Seperate works should be undertaken in small divi-ions of an adequate number of villages. No doubt field—work will engage a large number of men, women and children; but to many of the agriculturists will be necessary a free loan of seed grains and bullocks. The Government seem to have made no provision in this connection. Even at the present moment, the Government have failed to lend a helping hand to those affected by famine. The inability of the Government to cope with scarcity and famine is patent to all plain minds; and it pains us most to see that no conscience beats inside the hearts of the Government because they do not confess to their inability and do not propose to themselves any serious programme to meet the deadly foe. The worst evils of a famine grow and multiply in a geometrical proportion with the length of time, the range of famine districts and the intensity of the rigourous pangs of hunger.

This is the first time that this province is a prey to famine but Berar is not a whit better than other provinces in point of preparedness. Berar is as bad—if not worse than—as any other province within the affected areas. We should not lose sight of another fact as well. The last Fasli year was not one of complete drought and dire famine. The year witnessed a deficit in rain-fall, a partial failure of Kharip crops and almost a total failure of Rabbi ones. We did not expect that people will break down in the course of a few months. Single—handed this year could not work out such a dreadful spectacle. It seemed to give a finishing stroke to the sinking state of the masses. All materials of an explosion were together and it required an igniting force to explode them all. People were already driven to sad extremes and a year of famine drove them to the low depths of starvation. Such a state is the result of over—taxation, growing poverty and utter prostration in the hard battle of life. The political bleeding caused by the British administration drains away the wealth of the province and we do not know how this drain can be stopped unless and until the expenses of the administration are curtailed and the revenues are allowed to accumulate from one year to another. The present administration is good from all sides except one. It is the drain of the material resources of the province. If any one be to blame on this account it is the British rule. The mistake is so serious that an ordinary famine entails upon the people the worst sort of beggary, starvation, and death. The picture is not overdrawn. What is true of the British India is doubly true of this province. The British Government is responsible for this sad turn of affairs. The annual reports proclaimed from year to year that the people are sinking gradually and their holdings are fast changing hands. This was a sure index of adverse prospects. But no one paid a moment's thought to this matter.

We have traced this causal relation o facts because we wish to raise an alarm and call the Government to do their duty towards the people. The State must maintain the lives of its people and no shirking of the task will benefit the rulers as well as the ruled. We close it with an earnest prayer that ample funds be provided to save people from the clutches of the deadly foe.

The last forecast of the probable character of the south—west monsoon rains of 1897 is neither pleasing nor disappointing. It is an attempt to generalize the experiences of the past 20 years. Data are gathered from the snowfall on the Himalayan ranges, the meteorology of the previous years and the conditions of weather in the Indian Ocean. We give below the chief conditions which determine the extension and general strength of the monsoon—currents:—

"The chief features or conditions which influence and determine the extension and general strength of the sourth—west moonsoon currents are as follows:

1*st*. The amount and time of occurrence of the cold—weather snowfall in the mountain districts adjacent to Northern India.

2*nd*.—The local peculiarities of the weather in India immediately antecedent to the advance of the monsoon currents across the coasts of Bombay and Bengal into the interior, and which it is found are generally initiated during the hot weather, and are frequently more or less persistent in character. These abnormal feautres are, on the whole, best estimated by means of the variations of pressure from the normal.

3*rd*.— Local peculiarities in the Bay of Bengal and Arabian Sea over which the monsoon currents pass before they reach India and probably also the Indian Ocean, which is the source of the massive current of the south-west monsoon in India."

All these topics are nicely dealt with in the learned and scientific report of Mr. John Elliot the Meteorolgical Reporter and it is worth studying accurately the various conditions that determine the monsoon—rainfall in India. We have not got space enough but we invite students of science to master the subject so abely expounded in the above mentioned official document. Mr. John Elliot summarizes his fore—cast of the normal strength of monsoon in a short interesting para that runs as below:—

"The general conclusion is that the rainfall may be deficient to an exten depending chiefly upon the strength of the moonsoon in Sind, Cutch, the North and West Panjab and West Rajputana; that it will very probably be at least normal in amount in Central India, Bengal and the northern half of the Peninsula, except perhaps Berar, Khandesh and the West Deccan, and may be in moderate excess in the eastern half of the North—Western Provinces Bihar, West Bengal the Central Provinces and the eastern states of Central India. It will probably be normal or in slight defect in Burma, Assam and perhaps in East and North Bengal."

## वऱ्हाड

हवामान— वारा सोसाट्याचा वाहतो, अभ्रमंडप एकसारखा असतो, आणि ठिकठिकाणीं थोडा पाऊसही पडला. हवेंत शीत व्हाई वाटते. पाऊस जरा उशीरानें येणार आहे तथापि चांगला पडेल असा रंग दिसतो. ऋतु पालटल्यामुळें किरकोळ दुःखणीं वळावलीं आहेत.

नवीन परवान्याच्या पद्धतीमुळें आणि दुष्काळामुळें यंदाचा मोहरम पुष्कळ फिका पडला. दगाधोका वगैरे कांहीं झाला नाहीं.

वऱ्हाड प्रांतांत तारीख ३१ मे रोजीं दुष्काळाच्य कामावर २३६४२ लोक असून फक्त रोजी ५८१७ इसमास मिळते. एकंदर संख्या मागील आडवड्या पेक्षां १६ ४ इसमांनीं कमी आहे पण त्याला कारण दुष्काळाचीं कामें बंद पडल्याचें आहे.

मि. जे. एच. आबाट हे झांशीहून कळवितात कीं दरमणी २ रुपया प्रमाणें २० हजार मण वाळलेले गवताचे गठ्ठे वऱ्हाडांतील कोणत्याही रेलवे स्टेशनावर पुरविण्यास ते तयार आहेत. चारा फार महाग आहे तेव्हां ठोकळ गिऱ्हाईकांस ही गवताची सोय किफायतवार पडेल.

### नोटीस

रा० रा० दिनानाथ गोपाळ साहू या दुकानचे मालक पांडुरंग अज्ञान पालन करणार मातोश्री चंद्रभागा बाई जळगांव यांस

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा नवरा गणपतलाल वैद्य यांनीं दिनानाथ बाबा यांचे नांवानें मृत्युपत्र करून देऊन त्यांचे जवळ ठेवलेली रकम रुपये २४५९८—। धर्म करण्यासाठीं ठेवली असून त्याप्रमाणें त्यांनीं कोणतीच व्यवस्था किंवा धर्म केला नाहीं. त्यांच्या विश्वासानुरूप फक्त त्यांसच जो अधिकार दिला होता, तो, ते वारल्यामुळें कायदेशीर रीतीनें कोणासच मुळींच राहिला नाहीं; सबब कळविण्यांत येते कीं, तुह्मी धर्म न करितां सदर्हू ठेव जी जमा आहे, ती नोटीस पावल्या दिवसा पासून १५ दिवसांचे आंत आमची आह्मास देऊन रशीद घ्यावी. तुह्मी तसें न केल्यास रीती प्रमाणें दावा करून खर्चा सुद्धां भरून घेतली जाईल. कळावें तारीख २६ माहे एप्रिल सन १८९७ इसवी. दस्तुर शेषराव नागोराव

सही

लक्ष्मीबाई जवजे गणपतलाल वैद्य
रहाणार जळगांव निशानी खुद्द हातची

## वर्तमानसार.

बेळगाव, धारवाड वगैरे टापूत पावसानें खूप बहार केली त्यामुळें तिकडे वाऱ्याचा उपद्रव कमी होत चालला आहे.

लढाई बंद झाली— डमाकस येथें ग्रीक व तुर्की फौजेची मोठी चकमक झडून त्यांत ग्रीकांचा पुरा फज्जा उडाला.

काबुलचे अमिरास आजपर्यंत जी १८ लक्ष रुपये खंडणी जात होती ती आतां १८॥ लक्ष रुपये केली आहे.

मोहरा सापडल्या—जुनागड संस्थानांत किल्ल्याचे उत्तर बाजूस वाटरवर्क्स खात्यांतील मजूर जमीन खणण्याचें काम करीत असतां त्यांना एक सुवर्णाच्या मोहरांनीं भरलेला हंडा सापडला. सदरच्या मोहरा ११ व्या १२ व्या शतकांतल्या असून त्यांचे वजन एकेक तोळा आहे. व त्यावर आरबी भाषेंतील कांहीं लेख आहेत.

हायकोर्टाचे उपयुक्त ठावः— खाटिकांच्या हातून गाई सोडवून नेल्याबद्दल पुष्कळ मुदतीच्या तुरुंगाच्या शिक्षा दिलेला एक खटला अपिलावरून कलकत्ता हायकोर्टांत नुक्ताच आला होता. त्यांत खाटिकाचे हातून गाई सोडविणें हा भयंकर गुन्हा होतो हें मानिस्त्रेटचें विधान न्यायमूर्ती जज्जांनीं नापसंत करून आरोपीस झालेल्या सक्तमजुरीच्या शिक्षा रद्द केल्या. व त्यांना थोडा थोडा दंड करून सोडून दिलें. या प्रसंगासारखे प्रसंग जिकडे तिकडे वारंवार येत असल्यामुळें कलकत्ता हायकोर्टाचा हा ठराव सर्वत्र फार महत्वाचा होईल हें सांगावयास नको.

दुसरा ठरावः— मानिस्त्रेट लोक समरीट्रायलच्या अधिकारांत कित्येक लोकांना कारण दाखविल्या शिवाय चापून शिक्षा देतात त्या संबंधाचा आहे. बंगाल्यांतील राणाघाटच्या सब डिव्हिजनल आफिसरानें कारण न दाखवितां बऱ्याच लोकांना शिक्षा दिल्या होत्या, परंतु कारण लिहिल्या शिवाय शिक्षा देणें गैरशिस्त आहे असें कलकत्ता हायकोर्टानें ठरवून झालेल्या सर्व शिक्षा रद्द करून आरोपीस मुक्त केलें. कलकत्ता हायकोर्टानें केलेला हा ठराव सर्व मानिस्त्रेटांनीं अवश्य ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

" हिंदुस्थानांतील पर्जन्यवृष्टीचा निकट संबंध दक्षिण आफ्रिकेंतील वायुच्या गतीशीं आहे. गेल्या वर्षी तिकडील हवामानावरून हिंदुस्थानांत अवर्षण होईल, असें अगाऊ भविष्य केप कालनी येथील वायुचक्रशास्त्रवेत्ते मि० हाचिन्स यांनीं कळविलें होतें व त्याचा ठोकताळाही आला. गेल्या जानेवारी पासून मे पर्यंतच्या वायुचक्राच्या अनुभवावरून ह्याच हचिन्स साहेबांनीं यंदा अवर्षणाची भीति हिंदुस्थानास नाहीं, असें भविष्य ता. ७ रोजीं हिंदुस्थानसरकारास तारेनें कळविलें आहे. हे साहेब ह्मणतात कीं, केपकालनीकडे जानेवारी महिन्याच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत आग्नेय दिशेकडे वाऱ्याचा जोर साधारण मानापेक्षां ज्यास्त होता तेव्हांपासून एप्रिलच्या मध्यापर्यंत साधारण मानापेक्षां कमी; तथापि गतसालच्या त्या मुदतीपेक्षां बराच ज्यास्त होता. १९ एप्रिल पासून पुढें आजपर्यंत तर त्याचा जोर फारच वाढून ता. ३।४ व ६ मे रोजीं त्या वाऱ्याला तुफानाचें स्वरूप येऊन पुष्कळ पाऊस पडला व पोर्ट इलिजाबेथ येथें पुर आले. ह्या स्थितीशीं गेल्या २ वर्षीतील जानेवारीपासून एप्रिल अखेर पर्यंतचा तिकडील वाऱ्याचा जोर पर्जन्य वृष्टी ह्याची तुलना करून त्यावर हाचिन्स साहेबांनीं हिंदुस्थानांत यंदा अवर्षणाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं असें भविष्य केलें आहे. म० मि०

सांगली गांव फार स्वच्छ असून तेथें क्वारन्टाइनही आहे. वस्ती १९ हजार असून पटकीनें रोज २९।३० मरत होते. एके दिवशीं एकाच शाळेंतील १४ मुलें मेलीं.

कालका सिमला रेल्वे बांधून देण्याचा करार विलायतेस झाला.

सरदार अबदुल हक्क यांचा १२ वर्षांचा मुलगा नबाब सयद सरफराज अली खान यांच्या मरणानें सिकंदराबादच्या लोकांस फार वाईट वाटत आहे.

गोव्याच्या हद्दींत २६ मे रोजीं एकाएकीं फार मोठें वादळ होऊन कित्येक गलबतांस इजा होऊन कांहीं माणसेंही मेलीं.

इचलकरंजीपैकीं मणेरराजुरीगांवीं मुंबईहून एक वेडीण प्लेग घेऊन आली व ३०—४० तरुण धड ठार झाले. नंतर रोग गांवांत शिरला आणि २००।२५० ठार झाले!

जुबिलीचीं मानपत्रें २२ जून रोजीं गव्हर्नर जनरल घेतील.

सिमला म्युनिसिपालिटी जुबिलीप्रीत्यर्थ २ हजार रुपये रोषणाईत खर्च करणार.

टर्कीला आनंद प्रदर्शीत करण्या साठीं कानपूर येथें २५ हजार मुसलमानांची एक सभा झाली.

दुष्काळामुळें एकंदर रेल्वेचें ९५ लाखांचें नुकसान झालें.

राणीच्या उत्सवा प्रीत्यर्थ बाह्य प्रदेशीं जाणाऱ्या पत्रांवरील पोष्टेज कमी करण्याचें घाटत आहे. पैशाला पैसा मिळतो.

बलारी प्रांतांत डाक्टरांची मोठी टंचाई उडाली आहे.

जुबिलीप्रीत्यर्थ कलकत्यास अर्धा लाख वर्गणी गोळा झाली.

इजिप्तमधील खलीफा फौजेचा मोठा जमाव तयार करीत असून जिवावर उदार होऊन लढणार आहे असें ह्मणतात.

चीन सरकार रेल्वे करतां बेलजम मधील कर्ज काढीत आहे.

ग्रीसचा राजा सहकुटुंब आपल्या राजवाड्यांत चंबुगबाळें आटपून निघायाच्या तयारींत आहे. अथेन्स व कान्स्टांटिनोपल येथें एक विचार होत नसल्यामुळें मध्यस्तीचा इतक्यांत कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं. लढाई बंद करण्याचा आमच्या हातून होईल तेव्हढा प्रयत्न आह्मी करतों असें टर्कीच्या पत्रास परराष्ट्रांच्या वकिलांनीं जबाब दिला आहे. अथेन्स येथें कोणत्याही प्रकारची चळवळ नसून शांतता आहे.

थरमापियल येथें जयत तयारी करण्याचा ग्रीसनें घाट घातला आहे. ग्रीस दरबारांत भांडणें होऊं लागल्यामुळें फ्रेंच व बेलजमच्या वकिलांनीं तेथें न जाण्याचा निश्चय केला आहे.

टर्कीनें आपलें वचन पाळलें नाहीं असें ह्मणतात.

संडा अखातावर आमचें स्वामित्व कराल तर आह्मी तुह्मास मदत करतों असें जर्मनीनें ग्रीसला कळविलें होतें.

क्रीटन लोकांचा बंडावा चालूंच असून त्यांनीं इटालियन लोकांवरही गाळ्या घातल्या. ठा. अ.

सोन्याचें मोठें उत्पन्न—आस्ट्रेलिया बेट १०० वर्षांपूर्वी लोकांस माहित झालें त्या बखतांत इंग्लिश लोकांच्या सात वसाहती आहेत. त्यांनीं गेल्या ४६ वर्षांत जमिनीच्या पोटांतून किती सोनें काढून जगाच्या संपत्तीस भर घातली हें पुढें दिलेल्या आकड्यावरून दिसून येतें.

| | औंस |
|---|---|
| व्हिक्टोरिया. | ६१०३४८८४ |
| न्युझीलंड | १३३१२८३७ |
| न्यू सौथ वेल्स | ११७१०५१० |
| क्वीन्सलंड | १[illegible]१७२०७३ |
| वेस्ट आस्ट्रेलिया | ९६७६२६ |
| टास्मानिया | ८८६८२२ |
| सौथ आस्ट्रेलिया | ५०७५९३ |

मनुष्यास अन्न किती पाहिजे—मध्यम आकृतीच्या पूर्ण वाढलेल्या, आणि बरेंच काम करणाऱ्या मनुष्यास दररोज ३ पौंड ह्मणजे दीड शेर अन्न पाहिजे. ह्या दीड शेर अन्ना पैकीं १/३ प्राण्यन्न, आणि बाकीचें वनस्पत्यन्न असावें असें डाक्टर अलबिनलई ह्यांचें ह्मणणें आहे.

अर्धा शेर अन्न मनुष्याच्या आंगांत शक्ती ठेवण्यास बस्स असें ठरवणारे मुंबईचे माजी गव्हरनर सर टेंपल, व हल्लींचे गव्हर्नर लार्ड स्यांडहर्स्ट ह्यांचें मत वजनदार कीं डाक्टर अलबिनलई ह्यांचें मत वजनदार हें ठरवण्यास शहाणा पाहिजे आहे. शु० सु०

पुणें, सातारा, धारवाड, विजापूर वगैरे जिल्ह्यांत गेल्या आठवड्यांत थोडथोडा पाऊस झाल्याची खबर आली आहे.

सिकंदराबाद येथील १९ व्या हुजारस फलटणींत पटकीचा आजार झपाट्यानें चालू झाला आहे.

मरकीचा प्रसार होऊं नये ह्मणून पुण्यांतील ताबुताची मिरवणूक बंद ठेवण्यांत आली आहे. तसेंच आळंदी व देहूच्या पालख्याही बंद केल्या आहेत.

टर्की व ग्रीस यामध्यें लढाई उपस्थित करणारे क्रीटचें बंडखोर लोक अद्याप गडबड करीत आहेत, त्यांचें ह्मणणें क्रीटला स्वराज्य द्यावें पण ते अशा शर्तीनें कीं, टर्कीचें लष्कर क्रीट मध्यें राहूं देऊं नयें.

न्युयार्क येथून दोन व सानफ्रान्सीसकोहून एक अशीं तीन जहाजें मक्यानें भरलेलीं हिंदुस्थानांत यावयास निघालीं आहेत. ह्या तीन जहाजां मिळून पांच लाख बुशील धान्य आहे. स० वि०

डुकरास सर्पदंश बाधत नाहीं. कारण त्याच्या आंगावर चरबीचा थर इतका जाड असतो कीं, त्यास सर्प चावला तरी त्याचें वीष त्याच्या रक्तवाहिन्यापर्यंत पोंचत नाहीं.

चीनमध्यें दुष्काळ पडून अतोनात लोक अन्नान्न करून मरत आहेत. दी. बं.

कृत्रिम बुलबुल पक्षीः—

मनुष्य आपल्या चातुर्यानें एक जीव घालण्या खेरीज काय वाटेल तें करील, असें जे ह्मणतात तें कांहीं माणसांच्या कृतीवरून अगदीं खरें वाटूं लागतें. रशियांतील एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या सांगीवरून एका फ्रेंच कारागिरानें एक यांत्रिक बुलबुल पक्षी तयार केला. याचे पूर्वी यानें पुष्कळ गाणारे पक्षी तयार केले होते. परंतु हा पक्षी तयार करण्यांत यानें आपल्या कर्तबगारीची अगदीं कमाल करून सोडली. या पक्षाचें गाणें अगदीं हुबेहूब निघावें ह्मणून तो रानांत जाऊन राहिला. या पक्षाच्या गळ्याची हुबेहुब नक्कल व्हावी ह्मणून त्यानें एक अत्यंत लवचीक अशी तांब्याची बारीकनळी तयार केली व तींत एक बारीकसा पोलादी दट्या घातला हा दट्या त्या नळीत वरखालीं होण्यास यत्किंचित वारा उपयोगी पडावा अशी व्यवस्था केली होती. नंतर ती नळी त्या कृत्रिम पक्षाच्या गळ्याच्या जागीं बसवून वरून पिसें वगैरे लावून सर्व आकृती बुलबुल पक्षाप्रमाणें तयार केली. नंतर हवे यंत्र व्यवस्था नीट बसवून त्याची एका घड्याळाशीं जोड बसवून दिली. त्या घड्याळास किल्ली दिली कीं या पक्षाच्या पोटांतील भाता सुरू होई व वर सांगितलेल्या सर्व व्यवस्थेमुळें त्या पक्षाच्या कंठांतून गाणें निघूं लागे. त्यांत कांहीं उणीव राहूं नये ह्मणून हजारों वेळां बुलबुल पक्षाचें गाणें ऐकून त्या कारागिरानें आपल्या यंत्र व्यवस्थेंत सुधारणा केल्या. व शेवटीं इतकी सिद्धि मिळविली कीं, तो पक्षी नुसता गाई इतकेंच नव्हे, तर गातांना त्याचें तोंडही निरनिराळ्या प्रकारचें होत असे. व तो या फांदीवरून त्या फांदीवर उडतही असे.

अतिशय जड असून उडणारा पक्षी रशियाचे दक्षिण भागांत हे पक्षी सांपडतात. त्यास बस्टर्ड ( ओटीसटार्डा ) असें ह्मणतात. याची आकृती नेहमींचे देशातील काळ्या कोंबड्यांच्या सारखी असते. परंतु या पक्ष्याचें वजन त्या कोंबड्यापेक्षां कितीतरी पटीनें अधीक असतें. उडणाऱ्या सर्व पक्ष्यामध्यें याच्या इतका जड पक्षी दुसरा कोणताही नसेल इतका जड प्राणी असून पतंगा सारखा आकाशांत अगदीं उंच उडतो ही मोठी आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट होय हा पक्षी पुष्कळ दिवस वाचतो. तो ह्मातारा झाला ह्मणजे त्याचें वजन पसतीस पासून चाळीस पौंड असतें. आणि जेव्हां तो चांगला आपल्या तारुण्याच्या भरांत असतो, तेव्हां त्याचें वजन चाळीस पासून पन्नास पौंड असतें. पूर्वी हेच पक्षी युरोपच्या पश्चिमेकडच्या वाळूच्या ज्या मोठमोठ्या टेकड्या आहेत त्या ठिकाणीं फार सांपडत असत. आतां क्यास्पियन समुद्राच्या उत्तर किनाऱ्यालाही त्यांनीं आपली वस्ती केली आहे. मादी जी अंडीं घालते ती साधारण कवठा यवढीं मोठीं असतात व चांगलीं जडही असतात. यान तोडीचा जड प्राणी दुसरा 'कॅसावरी' या नांवाचा आहे परंतु त्यास उडतां मुळींच येत नाहीं. [illegible]च्या अंगांत ताकद बरीच असते. तो आपल्या पंखांच्या पिसांनीं कोणत्याही प्राण्याला खेंचराप्रमाणें खूप मारूं शकतो. व साळूप्रमाणें तो आपलीं पिसें सट्कन सोडूं शकतो. हीं पिसें भाल्या प्रमाणें तीक्ष्ण असून आंगास टोचतात. क.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास………………………४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस …………८१ ८६
दुसरे खेपेस …………८१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly……… 3 ……… „ 8 as
Single copy ……………… 4 as

Advertisement.
Below 10 lines … 2 Rs
Per line over 10 … 4 as
Repetition Per line … 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 21 JUNE 1897 NO 24
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २१ माहे जून सन १८९७ इ० अंक २४

### जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

---

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोला म्युनसिपाल कमेटीचे हद्दींतील वाराफतराचें आंत गुरें चारण्याचे हक्कांचा लिलांव सन १८९७।९८ सालाबद्दल ता. २ माहे जुलई सन १८९७ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें. ता. ९।६।९७ इसवी.

K. G. Damle
Secretary
A. M. C.

---

### नोटीस

मेहेरबान अमीरखा वलद दगडू मुसलमान सराय पुरा जळगांव पोस्ट जळगांव यास.

नोटीस देण्यांत येते कीं माझे पुतण्या पासून जी जीं शेतें तुमचे जवळ वहितीस आहेत त्या शेताची माझे मालकी बद्दल हायकोर्टांत निकाल झाल्याबद्दल तुह्मास [illegible] असून आह्मीही ताकीद केली आहे. [illegible] ती शेतें ताब्यांत घेण्याविषयीं कोर्टांत एप्रिल महिन्यांत दरखास्तही दाखल झाली आहे कोर्टाच्या सुटीमुळें दरखास्त अमलावारीस आली नाहीं असें समजून तुह्मी बाळकृष्ण गोविंद याचे सहात माझी शेतें यंदां पेरून पीक खाण्याचे तयारींत आहां परंतु हें तुमचें करणें गैर आहे. सबब नोटीशीनें कळविलें जातें कीं तुह्मी माझीं शेतें पेरूं नये व कीस्तगारी करूं नये. तसें केल्यास हीच नोटीस कोर्टास दाखवून जबाब घेतला जाईल व तुमची नुकसानी मिळणार नाहीं. ह्या नोटीशीचा खर्च तुमचे वर बसेल कळावें. ता. १२।६।९७ इसवी.

( सही )
लक्ष्मी जवजे गणपतलाल निशाणी खुद्द.

---

### नोटीस

रा. राजश्री बाळकृष्ण गोविंद पटवर्धन जलगांवकर यांस.

नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे कुळमुख्त्यार असतांना कांहीं दस्तैवज माझे पासून केले असल्यास ते खरे आहेत असें समजूं नये जें कांहीं केलें असेल तें मला निवळ थापा आणि फुसलावून करून घेतलें असावेत असें समजावरूनच मी तुमचें मुख्त्यारपत्र रद्द केलें आहे. या कारणानें तुह्मी लोकांस फितूर देऊन व तुह्मी लोकांस मदत होऊन माझीं शेतें पेरण्याचे फिकीरींत आहा. माझे मालकीचा हुकुमनामा तुमचे हातचा असोन मी कोर्टांत दरखास्त दाखल केली हें तुह्मास ठाऊक आहे. कोर्टाचे सुटी मुळें तावा मिळाला नाहीं करितां तुह्मी कोणतेच प्रकारचा माझे शेता संबंधीं फितूर किंवा किस्तकारी व पेर वगैरे केली तरी याज बद्दल नुकसानीस आणि बाकी इतर बाबीस पात्र व्हाल. तारीख १२ माहे जून सन १८९७ इ०

[ सही ]
लक्ष्मी जवजे गणपतलाल निशानी खुद्द.

---

### जाहिरात

तमाम लोकांस कळविलें जातें कीं माझे मालकीचे शेताबद्दल हायकोर्टाचा ठराव झाले आहे असे सर्वत्रास माहीत आसोन कोणी माझी जमीन वाहील किंवा पेरील तरी त्याबद्दल मी जबाबदार नाहीं मी कोर्टांत दरखास्त दाखल केली आहे सुटीमुळें ताब्याची अमलावारी झाली नाहीं करितां कोणी शेताची किस्तगारी किंवा पेरणी करूं नये केल्यास लबाडीचे होईल व हीच जाहिरात कोर्टास दाखविली जाऊन कोर्ट हुकूम नाम्याप्रमाणे शेतें ताब्यांत घेतली जातील. किस्तकारीस पेरीचा सबब कोणताच ऐकला जाणार नाहीं. सबब सर्वत्रास माहितीस्तव कळविलें आहे ता. १२।६।९७ इ०

[ सही ]
लक्ष्मी जवजे गनपतलाल निशाणी खुद्द.

---

### नोटीस

गोविंदा वल्लद बालाजी भालतडक वस्ती तर्फे उगवे तालुके आकोला यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मास मी कुलमुखत्यार नामा तारीख २८ माहे मे सन १८९५ इसवी रोजी देऊन मुखत्यार नेमले होते, तें मुखत्यारपत्र, ही नोटीस तुह्मास पावल्या तारख पासून मी रद्द केलें आहे. व तुमचे जवळ माझे कोणतेच प्रकारचे कागद पत्र वगैरे कांहीं एक राहिलें नाहीं कळावें ता. १९ माहे जून सन १८९७ इसवी.

( सही )
तुळसाबाई मर्द दानाजी पार्धी वस्ती उगवे हिच्या हातची निशाणी खुद्द बांगडी.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मी गोविंदा वल्लद बालाजी भालतडक उगवेंकर यांस. तारीख २८।५।९५ इसवी रोजीं कुलमुकत्यार नेमलें होतें तें मुखत्यारपत्र आज तारखेस रद्द करून सदरहू इसमास मुखत्यारीहून काढले आहे याच्याशीं माझे संबंधानें कोणीच कोणतेच प्रकारें देववेव वगैरे करूं नये. केल्यास त्याची जबाबदारीन मी नाहीं. ज्याचा तोच आहे. कळावें तारीख १९।६।९७ इसवी.

( सही )
तुळसाबाई मर्द दानाजी पार्धी वस्ती उगवें निशाणी खुद्द बांगडी.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ७ शके १८१९

पंढरपूर तालुक्यांतील तारापूर येथील शाळा मास्तर रा. रा. वामन जनार्दन सोमण हे एक अद्भुत चमत्कार कळवितात कीं तेथून पाव मैलावर श्रीवैजनाथाचें हेमाडपंती देवालय आहे. तेथें गेल्या महाशिवरात्रीचे दिवशीं एक स्वामी बसले असतांना एक मद्रासे कडील तमणाचार्य ब्राह्मण तापानें विह्वळ झालेला असा आला. तो कांहीं तासांचा सोबती आहे असें वाटत होतें पण स्वामीच्या सांगण्या प्रमाणें राजश्री सोमण यांनीं दोन यंत्रें त्या आजाऱ्याचे जानव्यास बांधलीं आणि ब्राह्मण चांगला बरा झाला. राजश्री सोमण यांनीं यंत्रावर पैसा मिळावेणार नाहीं असें सांगितल्या वरून स्वामींनीं अनुग्रह दिला कीं या यंत्राची योजना महामारी, ताप, भूतबाधा वगैरवर रामबाण होत जाईल व अपमृत्यु टळतील.

सदरहू राजश्री सोमण हे यंत्र तयार करून पोस्टानें पाठवित असतात आणि त्यांनीं असें लिहिलें कीं ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं आपल्या नांवासह दोन आण्याचीं पोस्टल टिकिटें पाठवावीं ह्मणजे यंत्र रवाना होईल. हें यंत्र तांब्याचे पेटींत घालून शुचिर्भूतपणानें तांबड्या रेशमांत ठेविलें तर चांगला गुण येतो. वरील गोष्टीची सत्यता पाहूं इच्छिणाऱ्यांनीं हा खर्च करून परीक्षा घ्यावी. यंत्रास विटाळ वगैरे न होऊं देण्याची खबरदारी घेत जावी. साधु पुरुषांचा महिमा विचित्र असतो तेव्हां आह्मी कांहींच विधान न करितां ही गोष्ट फक्त लोकांस कळवूं इच्छितो आणि अनुभव आल्या नंतर खरेखोटेपणा बद्दल शहानिशा करण्याचें धाडस करण्यांत येईल.

तुरुंग खात्या या सन १८९६ चा वार्षिक रिपोर्ट नेहमी प्रमाणें योग्य वेळींच प्रसिद्ध झाला आहे. या वर्षाच्या आरंभीं १३७४ पुरुष व ४१ स्त्रिया मिळून १४१५ कैदी वऱ्हाडच्या साही तुरुंगांत होते. बारा महिन्यांत ४०६० कैदी नवीन आले आणि ३९४० सुटून गेले. एकंदरीनें साल अखेरीला सर्व तुरुंगांत मिळून १५३५ कैदी शिल्लक होते. सालोसाल कैद्यांची संख्या वाढत आहे ह्मणजे १८९४ त १२९६ होती ती १८९५ त १४१५ झाली आणि १८९६ च्या अखेरीला १५३५ झाली.

सन १८९६ त १८१७ शिक्षा पावलेले कैद तुरुंगांत आले. वर्षानुवर्ष गुन्हे अधीक होत आहेत हें चिन्ह वाईट होय. १८१७ ही संख्या १८९४ त १६०३ होती. क्रमाक्रमनें अधिकाधीक लोक सरकारी गुन्हा करून शिक्षेला पात्र होत आहेत. जिल्हा वारीनें प्रत्येक दहा हजार पुरुषा मागें किती अपराधी इसम निघतात असें प्रमाण बसविलें तर असें आढळतें कीं:—

| जिल्हा | प्रत्येक दहा हजार इसमा मागें गुन्हेगार |
|---|---|
| यवतमाळ | १४ |
| उमरावती | ११ |
| आकोला | ११ |
| बुलढाणा | ११ |
| इलिचपूर | १० |
| वाशीम | १० |

या वरून यवतमाळ जिल्ह्यांत गुन्हेगार लोकांची संख्या मोठी आहे हें स्पष्ट होतें. त्या भागांत अडाणी लोक पुष्कळ लोक असून त्यांच्या पैकीं अधीक लोक गुन्ह्यांत सापडतात. यवतमाळ तुरुंगांतील शेंकडा ९७ पुरुष अक्षरशत्रु असतांत पण इतर जिल्ह्याच्या मानानें पाहतां एकंदर १७०९ कैद्या मध्यें १७४ लोक थोडेबहुत शिकलेले होते. शेतीचा उदीम करणाऱ्या मध्यें ९८२ गुन्हेगार निघाले असून हें प्रमाण एकंदर १८०९ संख्येशी मोठें पडतें. इतर धंदेवाले इसम कचित गु-

ऱ्हाच्या लटादोषांत सांपडतात आणि ही गोष्ट खरोखर शेतीचा उद्यम करणाऱ्यांसही सारखीच लागू पडते. ज्या कोणाला धंदा नाहीं तो शेतीचा किंवा मोलमजूरीचा धंदा स्वतांचा दाखवितो ह्मणून या वर्गातल्या गुन्हेगाऱ्यांच्या मोठ्या संख्ये मुळें शेतीच्या उद्यमाला चुकीनें लघुत्व येत आहे ही गोष्ट विसरता कामा नये.

शिक्षेच्या मुदतीच्या मानानें पाहतां दोन गोष्टी स्पष्ट दिसतात कीं एक महिन्या खालील शिक्षा पुष्कळ वाढल्या आहेत. एकंदर १०० शिक्षा झाल्या तर त्यांपैकी २३-८ शिक्षा एक महिन्या खालील १८९५ त होत्या त्या १८९६ साली २९-१ या प्रमाणा पर्यंत वाढल्या; आणि दोन वर्षा वरील पण १० वर्षा खालील शिक्षा १८९४ साली शेकडा ६ होत्या त्या १८९६ मध्यें ११-६ झाल्या. या शेवटील वाढी मुळें तुरुंगांतील लोकसंख्येला कांहीं कायमची भरती मिळते हें विशेष आहे.

जुने अपराधी ओळखून काढण्याची एक निराळी कला निघाली आहे. तिच्या योगानें हाताच्या अंगठ्याचा ठसा तसेंच डोक्याची ठेवण व लांबी रुंदी इत्यादि गोष्टी कायमच्या घेता येतात. या खुणा मनुष्याच्या बदलत नाहींत आणि त्या कधीं दोन मनुष्याच्या सारख्या असावयाच्या नाहींत. अंगुष्ठचिन्ह व शिराश्चिन्ह मनुष्य ओळखण्याला चांगलीं उपयोगी पडतात. तुरुंगामध्यें या कलेचा उपयोग करण्या विषयीं व्यवस्था चालू आहेत त्या पुढील सालापासून नीटपणें अंमलांत येतील. या कलेचा फायदा सरकारी दृष्टीनें जितका दाखविला जातो तितका खरोखर व्यवहारांत होईल अशी आमची मात्र खात्री नाहीं. अकोला व उमरावती या दोन तुरुंगाची व्यवस्था फार चांगली होती आणि तेथें कैदी लोक वाईट न वागल्यामुळें त्यांस शिक्षाहि कमी झाल्या.

## भयंकर भूकंप

( बंगाला व आसाम हे प्रांत उध्वस्त होऊन हजारों माणस मृत्युमुखीं पडलीं व कोट्यावधी रुपयांचें नुकसान झालें, जीवंत राहिलेले अन्नावांचून मरत आहेत. )

इंडियावर ईश्वरीक्षोभ झाला आहे असें दिसतें. प्लेगनें मुंबई इलाख्यांत कल्लोळ उसळला आणि दुष्काळानें सर्व देश ग्रासून टाकला अशा वेळीं बंगाल्यामध्यें भूकंपानें १२ वे तारखेस अनर्थ करून सोडला. त्या तारखेला सायंकाळच्या सुमाराला एकदम चिन्हें निराळीं होऊं लागलीं. तारायंत्राच्या विद्युद्वाहक मध्यें मोठी अनवस्था झाली. सरकारी वेधशाळे मध्यें पुष्कळ यंत्रें बरोबर चालेनात. एकदम धरणीचा कंप भासूं लागला आणि बंगाल्या प्रमाणें आसामांत त्या बरोबर शहरें, गांव, खेडीं, इत्यादि उध्वस्त होत चालली. कलकत्याच्या टोलेजंग इमारती देखील टिकाव धरीनात, बहुतेक पुष्कळ मेलीं व दगावलीं, ढाका शहर जमिनदोस्त झालें, आणि वटकामसांत तर भूपृष्ठावर सर्व उत्पातांनीं वस्तीस्थान केलें. वस्तुमात्रांचा नाश मोठा झाला पण त्या मानानें मनुष्यहानी कमी झाली.

हा भूकंपाचा अचका बंगाल्यांत मोठा जबरदस्त बसला. बंगाल्याच्या भागाकडून हा अचका लांबत लांबत पूर्व किनाऱ्याच्या बाजूनें मद्रासच्या दक्षिण भागापर्यंत पोचला. पण त्या पासून इतरत्र नाश कांहीं झाला नाहीं. हिमालयाच्या दक्षिण भागांतील रेल्वेचे पूल मोठमोठ्या भेगांनीं निरुपयोगी व धोक्याचे झाले आहेत. आगगाडीच्या सडका पुष्कळ ठिकाणीं नादुरुस्त झाल्या. आसामाच्या भागांत या भूकंपानें मोठाच गहजब उडाला. या भूकंपानें कोट्यावधी रुपयांचें नुकसान बंगाला इलाख्यांत झालें तथापि त्या संबंधाच्या ठिकठिकाणाच्या बातम्या अजून नीटशा एकत्र झाल्या नाहींत. कदाचित् हा पूर्णपणीं कळल्या नंतर या उत्पाताचें खरें भयंकर स्वरूप चांगलें निदर्शनास येईल. या भूकंपाचा धक्का त्या दिवशीं इंडियांतील अनेक भागांत बसला असें कळतें. वऱ्हाडांत सुद्धां आंदोलनाचा किंचित् भास झाला असें अडगांव, अकोट, इलिचपूर इत्यादि ठिकाणचे लोक कळवितात.

काचर येथील कचेऱ्या, तुरुंग, घरें वगैरे सर्व जमीनदोस्त गडप झालीं गेल्या गुरुवारीं डाक्यास पांच मिनिटें पर्यंत भयंकर धरणीकंप होऊन पुष्कळ हानी झाली. मेमनसिंग जिल्ह्यांतील ईश्वरगंज येथील नदीचा ओघ बदलून सर्व शेतें वालुकामय झालीं. सर्वत्र त्या भागांत हाहाकार झाला आहे. भूकंपानें उध्वस्त झालेल्या लोकांस मदत सरकारनें मोठी केली पाहिजे आणि जुबिलीचा पैसा या कार्यी प्रीत्यर्थ खर्च होईल तर फार बरें.

भूकंपा सारखा उत्पात सामान्य व अल्प स्वरूपाचा असतो तों पर्यंत पृथ्वीच्या पृष्ठ भागावर फेरफार वेताचातालाचेच असतात. परंतु जर आंदोलन जोराचें असलें तर सर्व सृष्टी बदलते. नद्या, डोंगर, शहरें, दऱ्या हीं सुद्धां बदलून विपरीत दशा पावतात. भूकंपाचा शास्त्रीय दृष्ट्या अद्याप विचार व्हावा तसा झाला नाहीं. पृथ्वीच्या गर्भांत जी उष्णता आहे तिचे हे परिणाम आहेत असा साधारण कार्यकारणभाव दाखवितात. परंतु मनाला समाधानकारक असा शोध या भूकंपाविषयीं व्हावयाचा आहे. अगदीं अलिकडे सृष्टींतील या चमत्कारा संबंधानें मत निराळेंच झालें आहे. भूकंपाचें कारण समजणें फार कठीण आहे. सृष्टींतील अगम्य गोष्टी पैकीं हा एक चमत्कार आहे. आणि मनुष्यज्ञानाची गति त्या मध्यें पुष्कळ प्रकारें कुंठित झाली आहे. नव्या मतानें मूळ तत्व असें आहे कीं श्वासोश्वासा प्रमाणें पृथ्वीचा पृष्ठभाग सदोदित उचंबळत असतो. त्याची ती गती मोठी शांत व गंभीर असते. पृथ्वीचें हें आंदोलन समुद्राच्या लाटा प्रमाणें चालत असतें पण त्याला कधीं स्थिरता नाहीं. हें आंदोलन अगदीं सौम्य असतें. या आंदोलनाची समगती समुद्र किनाऱ्या जवळ नष्ट होते आणि तेथें ती चलन पावते. या भूगोलाची गती ज्या वेध शाळेंत नोंदतात तेथें अशी गोष्ट अनुभवास आली आहे कीं एका बाजूला ज्या पृथ्वीच्या भागावर झाडें व गवत आहे तो भाग येतला आणि दुसऱ्या बाजूला सपाट मैदानाचा भाग घेतला तर सवृक्ष भागांत दबाव्याचा खनिना मोठा होतो आणि त्यामुळें झुलाझुली प्रमाणें त्या दोन भागांत गती चांगली स्पष्टपणें कळून येते. नद्द, नद्या इत्यादिकांकडून पृथ्वीवरील मृत्तिका, पाषाण, पर्वत इत्यादिकांस एका प्रकारची पाझरणी लागते आणि या प्रकारें पाझरलेली पदार्थ, अब्जादि मण वजनाची मृत्तिका समुद्रांत जाऊन तेथें सांचते आणि त्यामुळें पृथ्वीच्या नित्याच्या श्वासोश्वासगतीला भूपृष्ठावरून समुद्रांत जाऊन मिळण्या पदार्थांच्या चलनानें सत्वरपणा येतो आणि त्यामुळें ही गती मोठी झाली ह्मणजे अखेरीस भूपृष्ठ डोलूं लागते आणि त्या डोलालाच आपण भूकंप असें ह्मणत असतो. सारांश, भूकंप ह्मणजे त्वरितपणा व वेग पावलेलें पृथ्वीचें नित्याचें आंदोलन होय; आणि भूकंपाचा धक्का लाटेच्या लहरी प्रमाणें सर्व भूगोलाला हेलकावा देतो पण तो हेलकावा भूकंप झालेल्या प्रदेशाच्या आसमंतांत चांगलाच जाणवतो.

---

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें रा. रा. वामन दाजी ओक, हेडमास्तर, रायपूर यांस गेल्या १३ वे तारखेस नागपूर मुक्कामीं विषम ज्वरामुळें देवाज्ञा झाली. यांच्या मरणानें महाराष्ट्र भाषेचा एक खंबीर खांब खचला. महाराष्ट्र भाषेचा पूर्ण वेत्ता आणि महाराष्ट्रीय काव्यमंदिरांत रममाण असा सहृदय रसज्ञ या दृष्टीनें राजश्री वामनरावजी ओक यांची योग्यता फार मोठी आहे. हे गृहस्थ स्वतां ज्ञानसंपन्न होते इतकेंच नाहीं तर त्यांनीं आपल्या महाराष्ट्र भाषाभिज्ञतेच्या प्रभावानें सर्व महाराष्ट्रीयांवर अनुपम उपकार केले आहेत. आपल्या ज्ञानविकासाचा लाभ यांनीं अलिकडे 'काव्यसंग्रह' मासिक पुस्तकांतून देण्याचा क्रम चालविला होता पण त्या पुस्तकाचे ८१ अंक निघाले तोंच ५७ वर्षाच्या आंत या सद्गृहस्थाला मृत्यूनें घेरलें ही आमच्या दैवाची विषमता होय! काव्य संग्रहाचा कोणताही अंक हातीं घ्या ह्मणजे राजश्री ओक यांच्या टीका पाहून आपणांस मल्लीनाथादि टीकाकारांची आठवण होईल. यांचे पाठांतर फार मोठें होतें. बहुश्रुतपणाला जोड यांच्या मार्मिक व रसभरित लेखाची मिळाली ह्मणून बहुत मराठी काव्यें सुलभ वाटून त्यांचें अर्थगांभीर्य कळल्यामुळें मनोहर झालीं आहेत. कित्येक अर्थनिर्णायक टीपा त्या गृहस्थाच्या अभ्यासानें सतेज राहिलेल्या विद्येची व बहुसाल माहितीची साक्ष देतील. राजश्री ओक यांच्या मरणामुळें महाराष्ट्रभाषेच्या ऱ्हासकाळीं तिचा तिलकमणी नाहींसा झाला ही सर्व महाराष्ट्राची हानी झाली आणि ती पुन्हा भरून येण्या सारखी नाहीं.

'काव्यसंग्रहा'चें काम त्यांनीं अगदीं निरपेक्षतेनें केलें आणि त्यांच्या सारखा टीकाचार आपल्या महाराष्ट्रास मिळणें मुष्कलीचें आहे. त्यांनीं अनेक लेख वर्तमानपत्रांतून वगैरे लिहिले आहेत. काव्यमाधुर्य, पद्यरत्नमाला, लार्डबेकनचें चरित्र, गणपतिनिधनविलाप, थोरल्या माधवरावांचा मृत्यु इत्यादि त्यांचे ग्रंथ पुष्कळांस ठाऊक असतील. हे मूळचे चिपळूण तालुक्यांतील हेदवी गांवचे राहणारे होते. कालेजांत असतांना त्यांच्या नोकरीचा योग मध्यप्रांतांत आला तथापि त्यांनीं आपलें अध्ययन सतत चालविलें आणि जन्मभाषेची सेवा उत्कृष्ट केली. यांस एक पुत्र व दोन कन्या आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास उत्तम गती देवो.

## हिरादाणी आनंदोत्सव.

श्रीमती चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या कारकिर्दीचीं ६० वर्षे आपणा प्रजाजनांस ईशकृपेनें लाभलीं ह्मणून आज पासून सर्व राष्ट्रभर आनंदोत्सव होऊं लागतील. असा आनंदाचा योग इतिहासांत देखील क्वचित् आढळेल. आनंदोत्सवाचे प्रकार मानवी रुचिवैचित्र्या मुळें नानाविध आहेत पण त्यांचा नामनिर्देश करण्यास स्थलावकाश नाहीं. जयघोष, आनंदगर्जना, धन्यवाद, इत्यादि कोण त्या मार्गांनीं होणार आहेत हें जाणण्यास देखील कल्पनेला गती मोठी दिली पाहिजे. विलायतेंत होणारा आनंदोत्सव पाहण्याचें भाग्य थोड्यांसच आहे पण तिकडून येणाऱ्या बातमी वरून असें वाटतें कीं १९ व्या शतकांतील सृष्टीवैभव, शास्त्रीय शोधांचा परिपाक, मनुष्यकृतीनें कळणारी अगाध ईश्वरी महिमा इत्यादि गोष्टींचें तेथें प्रदर्शन होणार आहे असें अनुमान आहे.

वैभव व श्रीमंती या मध्यें इंग्लंडाला आमचा देश हार जाईल पण अंतःकरणांतील राजनिष्ठा, पूज्यभाव, व अनन्यगतिक आशासमुच्चय यांनीं या देशाच्या आनंदोत्सवाला जी महती येणार आहे तिच्या पुढें इंग्लंडाचा हिरादाणी समारंभ तुच्छ आहे. हा देश प्रस्तुत चिंताक्रांत आहे आणि दुष्काळ, रोग, व भूकंप यांनीं जर्जर आहे तथापि आज संप्राप्त झालेला सोन्याचा दिवस आनंदांत घालविण्यासाठीं सर्व राष्ट्र तत्परतेनें व उत्कंठेनें झटत आहे. ईश्वर करो, व्हिक्टोरिआ सरकार चिरकाल लाभो आणि इंडियन व ब्रिटिश हा भेदाभेद जाऊन उभय लोकांचा एकजीव होवो.

हिरादाणी आनंदोत्सवाचा सर्व फंड बंगाला व आसाम येथील लोकांवर भूकंपानें गुदरलेल्या प्रसंगांत मदत करण्याकडे उपयोग होईल अशी व्यवस्था करण्या साठीं आह्मी विलायतच्या व इंडियाच्या या समारंभाच्या चालकांस विनंती करितो. फार भयंकर प्रसंग आहे खरा! या उत्पाता पुढें मागील उत्पात कांहींच नाहींत.

---

## The Berar Samachar

MONDAY JUNE 21 1897

It is now settled once for all that the 13th sessions of the National Congress will be held at Amraoti in December next. The programme of holding a Congress in London detains us no longer from proceeding with the preliminary work of collecting subscriptions, forming a Reception Committee and arranging every thing to make the next Congress a complete success. The work is heavy and will tax the energies of the province to its utmost limits. Provinces superior in every respect to Berar discharged in past years this noblest duty which a nation could impose. The united voice of the Nation was however to meet next at Amraoti. Our leaders stood well nigh the test and responded to the righteous call of duty amidst the cheers of the Congress. We have thus been entrusted with the noblest mission in the world. The question is how we act up to the magnitude of the occasion. The

hour makes the man and we hope that the Congresswallas will leave off all lethargy and apathy. It is now high time to join hands. A heavy responsibility is thrown upon us and we shall be belying all hopes of the nation if we do not arise in all honesty, earnestness, promptitude of which a human heart is capable. Our best exertions will alone achieve the honors of the day. The dignity of labour is great and no work is impossible if we serve well our country in its time of need.

People misapprehend the lack of energy in this matter. This sad turn of mind is due to extraneous causes and there is no dream to shirk from duty; but famine has to account for the numerous blemishes in conduct of our leaders. There is no misgiving with us and we hope that the monsoon—rains will soon improve the situation and that the work of the Congress will make rapid progress and show signs of vitality and real movement.

---

The new assessments are being declared in all formal solemnity. The Rayots accept them with a heavy heart and return home in great dispair. The increase is on an average a little more than 29 per cent for the whole Taluka of Akola. But individual instances are very hard cases of rack—rent. The rise in the assessment approaches almost to 50 per cent in large portions of the Taluka. In some abnormal cases the assessment shows an increase of 400 per cent. We are sorry for the prospects of agriculture in years to come. The land—rent presses very hard and trenches upon the wages of the labourers in the filed. Agriculture does not promise, in the face of this heavy tax, to be a source of earning a competence of living. The standard of living is low but that too will make larger demands than what the profits of agriculture will permit. The main and major of the province is formed by people who live on agriculture. Their present condition is most alarming and the enhancement in the land—tax is at least so disappointing as to drive these people to the inmost depths of poverty, starvation and extinction in the end. Agriculture is not bad in itself but with the present encumbrances on land in point of debts and the large interests thereon it does not put forth a ray of hope to the peasants as a class of turning it to profit. Famine has already crushed these people, creditors will wrest lands from their hands, and the policy of land—revenue will further accelerate their down—fall. The Bagayit in the Taluka is very limited and the rates on that portion are dimished but those on the Jirayit portion are raised to a high degree. This is a political dodge to make people feel the smooth end of the wedge. But the pressure is equally excessive and needs a helping hand of the Government.

---

Today will witness the beginning of the national rejoicings on the completion of the 60th year since the ascention of Her Majesty the Queen Empress to the British throne. Numerous addresses from Indian principalities and institutions will flow in from all directions of Her Majesty's empire and will sing in one harmonious chorus the blessings of the British rule in India. The Victorian era will mark a memorable epoch in the history of civilization. There is no department of life which does not show an unique characteristic of the latter half of this century. Science has moulded anew the walks of life and society has shown a development well worth the admiration of the centuries to come. India was once the seat of learning but she lost all her grandeur in the viscititudes of misfortune; but owing to the benign influences of the British rule India returns to her days of past glory and can vie with any other nationality on the surface of the globe. The Indian Empire is a cluster of numerous nationalities that are being welded into one nation under the auspices of the British Government. The recent history of India records the soundest triumph of the British prestige.

It is futile to pass remarks on the subject—matter of the overwhelming addresses from all Indian subjects. But the address of the Poona Sarvajanik is conspicuous for its able and learned passages in the main body of the congratulatory letter. Even envy and hypocrisy could hardly find room in such a master—piece. The Sabha has ceased to be recognized by the local Government but we hope that it will be admitted back to its time—honored title and position.

---

We give below a para in which the learned President of the Bombay Presidency Association describes the good changes that have come over the Nation with a fervant hope of the future in the remarkable address of that assembly on the occasion of the Diamond Jubilee:—

" In all these various ways, the peace and prosperity of the country have been promoted with the result that during the past 60 years, population has multiplied nearly 100 per cent., cultivation has extended so as to keep peace with this growth, and trade and commerce have flourished beyond all previous measure and been beneficial both to England and India. India has become the chief customer of British manufacture and trade, and it affords a safe investment for the employment of nearly 500 millions of British capital in the development of India agriculture, manufacture and trade. The bonds which unite the two countries have thus become indissoluble, and under British protection the various races of India, speaking different languages, and professing different creeds, have learnt to feel for the first time that the connection between the two countries is a providential arrangement intended to weld them all together into a great Indian nation, owing common allegiance to the same Sovereign, and having common interests in the promotion of peace and good—will throughout the land. "

The Rast Goftar runs mad with the idea that the above statement goes against the spirit of evidence of Messrs. Dadabhai, Wacha and Gokhale. We are sorry that the learned Editor searches for an expression of views on the short—comings of the British rule in a congratularly address of the kind. A keen insight into the lines of the address will however instruct him of regards the deliberate omissions a certain matters unfit for an addess.

---

The following para summarizes the financial results to the State of the working of State and guaranteed railways in India:—

" The net receipts accruing to Governments from all State lines, after deducting the payments made to working Companies in respect of surplus profits or share of net earnings, amounted to Rx.9,517,863 ( paragraph 11 of Accountant-General note ), which gives a return of 6.11 per cent. on the total capital outlay actually incurred by the State as entered in rupees in the Government Accounts. This capital outlay does not, however, include that portion of the purchase price of the East Indian, the Sind Punjab and Delhi and the Eastern Bengal railways, which is being redeemed by the payment, from current revenues, of terminable annuities. If, however, in the case of the Guaranteed railways that have been purchased by Government the amounts of capital expended by the several companies prior to their purchase by the State *plus* the capital outlay since incurred by the State, be taken in lieu of the figures now appearing in the Government Accounts, which, as explained above, are not complete, the return given by the net receipts ( Rx. 9,517,863 ) is 5·12 per cent, as shown in paragraph 15 of the Accountant-General's note. These percentages indicate a satisfactory return on the capital expended, and the fact that there was a net charge to the State of Rx. 493,868 in respect of the State railways, as shown in paragraph 3 above, is due partly to the loss by exchange on the payments in England of the annuities and interest on the sterling portion of the capital, and partly to the fact that the annuities that are charged against the net revenues cover the enhanced value at which the capital of the several companies was taken over by Government and include also sinking fund charges for the redemption of the capital.

5. The working of the three Guaranteed railways during the year is reviewed in paragraphs 57 to 60 of the note. Including charges for land and supervision, the result has been a loss to the State of Rx. 1,061,752. The Great Indian Peninsula and the Madras railways entailed a loss of Rx. 745,583, and Rx 367,762 respectively; while the Bombay, Baroda and Central India railway was worked at a gain of Rx. 51,593.

On the other hand, however, although the result of working the Guaranteed railways has been a net loss to the State of Rx. 1061,752, the companies received during the year from Government a total sum of Rx. 479,750 as their share of surplus profits, which are, under the terms of the contracts, declared half—yearly the sterling interest being converted for the purpose of this division at the fixed contract rate of 1s. 1od. against 1s. 1·63814874*d*. the rate adopted in the Government Accounts of the year under review. "

---

## वऱ्हाड

हवामान—पाऊस नाहीं. वारा झुझाऱ्याचा सुटतो व आकाश साभ्र असतें. ठिक ठिकाणीं पाऊस पडला आहे पण आमच्या भागाला पर्जन्याची अवकृपा आहे. पटकी व गेगराई चालूं आहेत. पाऊस जरा लांबला तरी तो लवकरच चांगला पडेल अशी उमेद आहे.

उमरावतीस डायमंड जुबिली निमित्त मे. आर. आवर्ड जुडिशिअल कमिशनर यांच्या बंगाल्यावर उद्यां सायंकाळीं मोठ्या थाटाचा फलाहाराचा बेत आहे. न्यायाधीश वकील इत्यादिकांची मोठी गर्दी होईल.

आज रोजीं दोन प्रहरीं तीन वाजतां डायमंड जुबिली निमित्त आकोल्यास शर्यती होऊन बक्षिसें वाटण्यांत येणार आहेत. त्या शिवाय अन्नदान व वस्त्रदान हीं गरीब लोकांप्रीत्यर्थ खानगी वर्गणी मधून होणार आहेत.

आलिशान रेसिडेंट मि. फ्लौडन यांची स्वारी ऊटीहून हैदराबादेस गेल्या शुक्रवारीं परत आली.

आकोल्याचे पोस्ट मास्तर मि. हाफ़हाईह हे बढतीच्या जागेवर जाण्या साठीं येथील चार्ज देऊन तयारी करीत होते पण त्यास कालमाच्या आजारानें १८ वे तारखेस दिस्ताज्ञा झाली हें कळविण्यास वाईट वाटतें.

येथील सिव्हील सर्जन डाक्टर रेली यांच्या रजेंत इलिचपूरचे सर्जन क्याप्टन शार्मन हे काम पहात आहेत पण त्या रजेंत सर्जन लेफटेनंट एफ. एच. वाटलींग एम. बी सी. एम. आय. एम. एस. यांस बंगल्याहून येथें सिव्हील सर्जनचें कामावर पाठवीत आहेत.

गेल्या सोमवारीं उमरावतीस स्टांडींग कांग्रेस कमिटीची सभा भरून आनंदप्रदर्शक मानपत्र महाराणी सरकाराकडे धाडण्याचा ठराव झाला.

मलकापुरास ३००—४०० दुष्काळ ग्रस्तांस धान्याची मदत व मजुरी देण्यानें उदार कृत्य केल्यावरून रा. रा. विष्णुसा बाळकृष्णसा यांस खुर्चीची सनद सरकारांतून मिळाली हें कळविण्यास आनंद वाटतो. आमच्या जिल्ह्यांत अशा सनदा पुष्कळांस मिळण्या सारख्या आहेत.

पुढील महिन्या पासून कलकत्याची मेल गाडी नागपूर मार्गानें जाणार असून वेळापत्रकांत पुष्कळ फेरफार होणार आहेत.

खामगांवचे प्रसिद्ध साहू रा. रा. शाळीग्राम शेट यांस गेल्या गुरुवारीं देवाज्ञा झाली ही दुःखद गोष्ट होय.

येथील अनाथगृहांत आज रोजीं सकाळीं साडे सात वाजतां गरीब लोकांस डायमंड जुबिली प्रीत्यर्थ कपडा वाटण्यांत येईल आणि तसेंच त्यांच्या जेवणा बद्दल ही विशेष तजवीज करण्यांत येणार आहे. हल्लीं १०२ वर लोक अनाथगृहांत आहेत.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | १०७ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३० रु० |
| ,,( बनशी ) | १४० रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७॥= मण |
| सोनें | २७ तोळ |
| चांदी | ८३ |

---

### नोटीस

मी खाली सही करणार सर्वत्र लोकांस जाहिर करिते कीं, सिताराम वल्लद लक्ष्मण आमले राहणार भाडगणी तालुके मलकापूर यांस आमचे बिरादाराचे तंट्यासंबंधानें कोर्टांत वगैरे काम करण्या करितां मुखत्यारपत्र दिलें होतें त्या कामाचा निकाल झाला आहे तेव्हां आह्मी तें मुखत्यारपत्र तारीख १८ माहे मे सन १८९७ इ० पासून रद्द केलें आहे. आतां पुढें तो आमचे नांवावर कोणतेंही काम करील अगर पैशा अडक्याची उचापत करील तर त्याचे जबाबदार आह्मी होणार नाहीं. कळावें तारीख १७ माहे जून सन १८९७ इ०

[ सही ]
जानकी मर्द दानाजी घोडेसे
राहणार टेंभुरणी तालुके
खामगांव निशानी बांगडी

---

## वर्तमानसार.

अस्बेस्टस ह्मणून एक नवा धातु सांपडला आहे. स्रालचा कानडा ( अमेरिका ) देशांत ह्याच्या कित्येक खाणी सांपडल्या आहेत, व त्यांतून हा धातू काढण्याचें काम चाललें आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी हा प्रचारांत आला. हा जळणारा नाहीं, त्याच्यावर अग्नीचा कांहींएक परिणाम घडत नाहीं. ह्या कारणानें कित्येक उद्योगांत ह्याचा अत्यंत उपयोग होऊं लागून उद्योग धंद्यामध्यें मोठी क्रांति होण्याचा संभव आज दिसत आहे. हा धातू चकचकित तंतुमय आहे, व तो खडकांत रुतलेला सांपडतो. तो अनेक तऱ्हेनें उपयोगी पडून मनुष्य जातीचें कल्याण करण्यास कारण होत आहे. तो जळणारा नाहीं, उष्णतावाहक नाहीं, प्रतिध्वनी उत्पन्न होऊं देणारा नाहीं, त्यास वास नाहीं आणि कोणत्याही पदार्थाचा वास तो आपल्यावर राहूं देत नाहीं. कीटक होऊं देणारा नाहीं. ह्यामुळें स्वच्छता राखण्यास तो कारण होतो. रबरा सारखा तो लांब आंखूड होणारा आहे, पण त्याचा तुकडा पडत नाहीं. पाण्याचा थेंब त्यावर पडला तर डाग पडतां तो वाळून जातो, असें कित्येक बहुमोल गुण त्याच्या आंगीं आहेत.

साठ तोफांची सलामी—डायमंड ज्युबिलीचा जो दिवस नेमिला आहे त्या दिवशीं हिंदुस्थानांतील मोठमोठ्या ठिकाणीं ६० तोफांची सलामी दिली जाईल.

मोंगलाईच्या हद्दींतील नादेरे गांवीं ससाच्या शिकारीबद्दल त्या गांवचे लोकांचा व लमाण लोकांचा वाद होऊन उभयतांची चनचक्कर झडली. त्यांत तिघे इसम तर ठार झालेच. आणि १०।१५ इसम घायाळ झाले आहेत. शु. सू.

चीनाचे कांहीं प्रांत रशियन मागताहेत ! वरिष्ठ ह्मणून कीं काय ?

१ लाख ४ हजार केंस डोक्यास असतात असें एक शार्मण्य विद्वान प्रसिद्ध करितात, मोजणी बरोबर झाली कीं नाहीं याचा निमताना कोणी तरी घ्यावा.

२२ जून पासून विलायतेच पत्रास २॥ आण्याऐवजीं २ आणे पोस्ट हंशील पडेल.

काबुलाकडेस शिंगाचे सर्प आहेत.

जुबिल्युत्सवांत तुरुंगांतील कैद्यांपैकीं शेंकडा १५ प्रमाणानें चांगल्या वर्तणुकेचे कैदी सोडण्याचें ठरलें आहे.

लाखाचा दरवडा— कराची येथील तारेवरून समजतें कीं सिंदहैदराबादेंत १५।२० हत्यारबंद दरवडेखोरांचे टोळीनें एका गांवावर दरवडा घालून सुमोर लाख रुपयांची लूट नेली. पोलीस तपास करीत आहे; परंतु दरवडेखोरांचा कांहीं एक थांग दोरा लागत नाहीं.

बेळगांव येथें मातकांडे गल्लींत कै० रघुनाथसींग सुभेदार यांच्या घरीं चोरी होऊन घरांत असलेली रोकड व दागिने सर्व चोरीस गेल्याचें समजतें. एकंदर माल ६५ हजारांचा गेला असें ह्मणतात.

मुजफरपूर गारांची वृष्टि होऊन पुष्कळ घरांचा व वृक्षांचा चुराडा उडाला. कित्येक मनुष्यें व जनावरेंही मेलीं ह्मणतात.

दी. बं.

बनारस येथील शापशावर लाइट इनफन्ट्रीचा एक पंखेवाला मरून पडलेला आढळला. दुसऱ्या पंखेवाल्यांच्या सांगण्यावरून त्या पलटणींत एका सोल्जराच्या लत्ताप्रहारामुळें तो मेला असें कळतें. आरोपीस पकडला असून चौकशी चालू आहे.

कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यांना एकाच शहरांत सात वर्षांपेक्षां अधीक दिवस ठेऊं नये असा ठराव बडोदे सरकारानें केल्याचे कळतें.

पाटणा येथें एका नबाबाचे खुनामुळें मोठी गडबड उडून राहिली आहे. त्या खुनाची हकीगत अशी:—नबाबसाहेब आपल्या खोलीमध्यें निजल्यावर त्यांचे बायकोला मोठमोठ्या किंकाळ्या ऐकूं आल्या. व जाऊन पाहते तों त्यांचे खोलीमधून नागव्या तरवारी घेतलेले दोन इसम तिच्या देखत पळून गेले नबाबांच्या देहाचे तुकडे तुकडे झाले होते. पोलीस चौकशी चालू आहे.

पावसाचा सट्टा बंद झाला—कलकत्ता येथें चालत असलेला पावसाचा सट्टा बंद करण्यासंबंधानें जो कायदा करण्यांत आला आहे, त्यास नामदार व्हाइसराय यांची मंजुरी मिळाल्या वरून तेथील पोलीसानें बडाबझार येथील जुगारखान्याच्या आगाशीचा नाश करून टाकला. हा सट्टा यापुढें चंद्रनगर येथें चालावा अशी मी सुचना करण्यांत आली आहे त्या बाबत कित्येक सट्टे करणाऱ्या पुढारी मारवाड्यांचा अद्याप विचार चालू असल्याचें समजतें. म० मि०

अगदीं थोड्या वेळांत, थोड्या पैशात व थोड्या श्रमांत वाटेल तितकी जमीन नांगरून काढण्याची युक्ति फ्रान्समधील ला मोर्ने या नांवाच्या एक कल्पक मनुष्यानें काढिली आहे. त्यानें प्रथमतः आपलें एक मैल लांबीचें शेत विजेच्या नांगरानें सुमारें चार तासांत नांगरून काढिलें. हा प्रयोग इ० सन १८७९ सालीं करून पाहिला. पुढें इ० सन १८८१ सालीं मेनेर या नांवाच्या गृहस्थानेंही या विजेच्या नांगराचा प्रयोग करून पाहिला. नंतर कांहीं प्रयोगांनीं असें आढळून आलें कीं, विजेच्या नांगरानें जमीन उत्कृष्ट तऱ्हेनें नांगरली जाऊन त्याला पैसा व वेळ हीं अगदीं फारच थोडीं लागतात. हल्लीं जावा बेटांतही विजेच्या नांगरांनीं मोठमोठ्या खडकाळ व पडीक जमिनी लोक नांगरूं लागले आहेत.

एका तालुक्याच्या गांवीं धोंडोपंत बिनअकले या नांवाचे गृहस्थ वकिली करण्यास आले. त्यांची वकीलीची परिक्षा नुकतीच पास झालेली होती. परंतु कायद्याचें ज्ञान व त्या बरोबर व्यवहारिक ज्ञान या दोहोंचाही त्यांचें ठिकाणीं बराच अभाव होता असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांणीं पहिल्यांदाच एका कुळाचें जमिनीच्या कामांत वकीलपत्र घेतलें. खटल्याची तारीख येतांच वरील नवे वकील कोर्टांत हजर झाले. हा कोर्टांत उभें राहण्याचा त्यांच्यावर पाहिलाच प्रसंग आलेला. मुनसफांनीं खटला पुकारला व प्रतिवादीतर्फे वकिलाचें सर्व बोलणें ऐकून घेतल्यावर शेवटीं मुनसफ ह्मणतात, "यावर वादीतर्फे वकिलाचें कांहीं बोलणें आहे काय? हें ऐकतांच धोंडोपंत बिनअकले आपली पगडीबिगडी नीट सांवरून उभे राहून ह्मणतात, "माझें कांहीं एक बोलणें नाहीं. कोर्टाला माझी येवढीच विनंती आहे कीं, मी आहे अगदीं नवा वकील. व या गांवांत वकीली करण्यालाही अगदीं नवखाच आलेला आहे. खटल्याचा निकाल देणें हें कोर्टाच्या नजरेवर व मर्जीवर आहे. तेव्हां कोर्टानें माझे वादीकडचे येवढे दहा रुपये वसूल करून द्यावेत. दुसरं तिसरं माझं कोर्टाला कांहीं एक ह्मणणं नाहीं." असं ह्मणून वकीलसाहेब खालीं बसले. क०

ग्रीस बरोबरच्या लढाईत जय मिळविणाऱ्या टर्कीच्या सुलतानास हिंदुस्थानच्या मुसलमानांनीं मानपत्रें वगैरे पाठवून सुलताना बद्दलचा आपला ओढा जो व्यक्त केला तो त्यांचा राजद्रोहीपणा असून मुसलमानाचें तें इंग्रजी राज्यास अपायकारक आहे असें कित्येक इंग्रजांचें ह्मणणें प्रसिद्ध झाल्यावरून इंग्रज व मुसलमान यांची पत्रोपत्रीं इंग्रजी वर्तमानपत्रांतून मोठी कडाक्याचा चर्चा झाली. या चर्चेंत मुसलमानांनीं आपलें कर्तव्य काय हें स्पष्ट करून सांगितलें असून इंग्रजांनीं त्यांच्यावर राजद्रोहापणाचा आरोप केलेला आहे.

२२ जून रोजीं हिंदुस्थानांतले सर्व लष्करी कैदी बंदमुक्त होणार असें ठरलें आहे. सरकारच्या या कृत्यानें हिंदुस्थानांतल्या सर्व लश्करी लोकांस या जुबिलीची चांगली आठवण राहील. सरासरीनें पाहिल्यास कैदेंत असणाऱ्या लश्करी कैद्यांची संख्या युरोपिनांचीच जास्त असेल.

इंग्रजी फौजेची एक टोळी ३०० शिपायी १२ स्वार व २ तोफा अशी सरहद्दीवर शेरागी येथें जाण्या करितां ता. १० रोजीं दवाखेल येथून निघाली असतां दुपारीं २ वाजतां त्या फौजेवर डोंगरी लोकांनीं हल्ला करून तिघा इंग्रज आफिसरांस ठार करून तिघांस घायाळ केलें व नेटिवांपैकीं २४ ठार होऊन २५ घायाळ झाले. आतां पुढें काय होतें पहावें.

येत्या जानेवारीच्या २१ व्या तारखेस हिंदुस्थानांत खग्रास सूर्यग्रहण आहे. हें ग्रहण कसें लागतें वगैरे पाहण्याकरतां विलायतेहून वेगळाल्या तीन मंडळ्या हिंदुस्थानांत यावयास निघाल्या असून ते मुंबई इलाख्यांत वेगळाल्या ठिकाणीं बसून अवश्य ती माहिती मिळविणार आहेत. याशिवाय हिंदुस्थानसरकारही याच कामाकरतां तिरहूत येथें एक मंडळी नेमणार आहे. हें ग्रहण लागण्याचा विधी रत्नागिरी, सातारा, नागपूर, वगैरेच्या वाटेनें जाणार आहे. हा खग्रास मुंबईस चार मिनिटें दिसणार असून तिरहूत येथें दीड मिनिट दिसणार आहे.

आतां एल एल. बी. पुष्कळ होऊं लागले तेव्हां साध्या लोकाची वकीलीची परिक्षा बंद करावी अशी कित्येकांची तकरार येत आहे.

टर्कीचा झेंडा नांवाचे मुंबईस एक मुसलमानी वर्तमानपत्र निघत असून त्याच्या कर्त्यावर मुन्शी महंमद मकबा नांवाच्या गृहस्थानें अब्रूनुकसानीची फिर्याद केली आहे.

पुण्यांत, थोर घराण्यांतील एका सुशिक्षित स्त्रीनें एक पोपट पाळला असून तो तोंडानें मुका घेतल्याप्रमाणें शब्द करतो. हें तो कसा शिकला असेल हें मोठें कोडें आहे.

यंदां एकट्या हिंदुस्थानांतच दुष्काळ आहे असें नसून इंग्रजी राज्यांत विक्टोरिया न्यु सौथ वेल्स व कुइन्स लांड या प्रांतांतही दुष्काळ आहे असें सांगतात.

विशेष प्रकारची परवानगी घेतल्या वांचून हिंदुस्थांतले कुत्रे विलायतेस नेण्याची मनाई करण्यांत आली आहे.

बड्या तिघा बादशहांचा एकोपा पुन्हा ताजा होण्याचा संभव दिसतो.

फ्रान्सचा प्रजासत्ताक राज्याचा प्रेसिडेन्ट रशियन बादशहा भेटण्याकरतां सेन्ट पिटर्सबर्ग येथें जाणार आहे.

मि. सेलर्स नांवाचा एक साहेब सांगतो कीं, फौजेच्या जोरानें दक्षिण आफ्रिकेंत इंग्रजी सत्ता स्थापन होण्यास कठीण आहे, पण त्या भागांतल्या ओसाड प्रांतांत आपली ह्मणजे इंग्रजांची वसाहत करण्याचें सुरू केल्यास तो प्रदेश इंग्रजी सत्तेंत सामील होण्यास फार सोपें जाईल. युक्ती चांगली आहे, पण त्याच्या योगानें आफ्रीका ही दुसरी अमेरिका होणार नाहीं ना ? तसें झाल्यास आफ्रीकेंतले मुने शिद्दी रेड इंडियन प्रमाणें नाहींसे होऊन वसाहतवाले इंग्रज आफ्रीकन शिद्दी बनतील!

हुंडणावळ कोणास मिळावयाची व कोणास नाहीं याबद्दलचे नवे नियम गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले असून त्यांत "युरोपियन" शब्दांत इंग्रजी भाषा बोलणाऱ्या वसाहतीही दाखल केल्या असून युरोपियन शब्दांत स्टाटूटरी नसेल तेव्हां युरेशियनही धरावा असें ठरविलें आहे.

जुबिलीच्या समारंभाची तयारी—या समारंभाकरतां २० जून रोजीं जेथें पाद्री असेल तेथें ईश्वरोपासना व्हावी असें सरकारानें ठरविलें आहे. गव्हरनर स्वता राजकीय थाटानें पुण्यास २२ जून रोजीं देवळांत प्रार्थनेस जातील व त्यावेळीं तेथें असणाऱ्या सर्व सरकारी कामदारांनीं दरबारी पोषाखानें हजर व्हावें. ता. २१ व २२ रोजीं सरकारचा बावटा उभारला जाईल.

मसुरीस दीपोच्छव, खाना बाल, वगैरे होणार. टा. अ.

विजापुरानजीक बागेवाडी येथें रोज २५ लागून २५ लोक कॉलऱ्यानें मरत आहेत.

अफू खाणाऱ्या लोकांस प्लेगचा आजार होत नाहीं असें मुंबईच्या अफू मक्तेदारानें मुंबईंतल्या अफू खाणाऱ्या व ओढणाऱ्या माणसांच्या शोधावरून ठरविलें आहे. मुंबईस सुमारें १०००० लोक अफूच्या व्यसनांत अगदीं गर्क झाले असून त्यात कोणासही हा रोग झाला नाहीं. त्यांत एक माणूस रोज १३५ ग्रेन अफू खाणारा आहे.

कान कांपले:—बरेली येथें एका मोहल्यांतील गस्त देणारा पोलीस कानिस्टेबल एका ठिकाणीं झोंपीं गेलेला पाहून एका चोरानें त्याचे दोन्ही कान कांपले. चांगली शिक्षा झाली.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ ५ हाशील ८१२
सहामाही „ ३ „ ०८
साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.............................०४

नोटीशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ............८१ ८६
दुसरे खेपेस ............ ८१

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ......................... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 28 JUNE 1897 NO 25

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २८ माहे जून सन १८९७ इ० अंक २५

## जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची
बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोला म्युनसिपाल कमेटीचे हद्दींतील बाराफतराचें आंत गुरें चारण्याचे हकाचा लिलांव सन १८९७।९८ सालाबद्दल ता. २ माहे जुलई सन १८९७ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस सदर्हू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें. ता. ९।६।९७ इसवी.

K. G. Damle
Secretary
A. M. C.

नोटीस

रा. रा. बालचंद बनसीलाल व मोतीलाल बनसीलाल साहू दुकान आकोला यास.

खाली सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मजकडेस तुमचें कर्ज घेणें असून त्याजबद्दल मी तुह्मास रुपये १५०० चा व एक दस्ताऐवज रुपये ५०० चा असे दोन दस्ताऐवज शेती गहाण देऊन करून दिले आहेत तरी सदरहू गहाणाचे दस्ताऐवजाचा रुपये घेऊन निकाल करावा ह्मणून मी आपणास एक दोन वेळ ह्मटलें आणि आजरोजीं ह्मणजे तारीख २३ माहे जून १८९७ इसवीस मी आपले येथे दुकानावर रुपये घेऊन आलों असतां आपण हिशेब न करितां व दुसरे हुकुमनाम्याचा संबंध मजला दाखवून रुपये घेत नाहीं. सर्व हुकुमनाम्या सुद्धां रुपये द्यावे ह्मणजे गहाणाचे दस्ताऐवज देईन असे ह्मणतां तर ही सबब बरोबर नाहीं. कारण आपले जवळ जें गहाण आहे त्या दस्ताऐवजाचा निकाल करून घ्यावा व गहाणाचा हक्क सोडावा. या करितां आपणास नोटीस देण्यांत आली आहे तरी ही नोटीस पावतांच सदरहू गहाणाचे दस्ताऐवजाचा निकाल करावा व गहाणाचा दस्ताऐवज मजला द्यावें. तुह्मास नोटीशींत लिहिलेले दस्ताऐवजांचें रुपये देत असतां बाकीच्या इतर हुकुमनाम्यासुद्धां सर्व रुपये द्यावेत ह्मणून अडचणींत घालून आह्मास बुडविण्याचा तुमचा हेतु दिसतो. तुमच्या गैरवर्तनामुळें आह्मास ही नोटीस देणें भाग झालें. आतां पुढें सदरील नोटीशींत लिहिलेले तुमचे गहाणाचे दस्ताऐवजासंबंधानें आह्मी कोणत्याही प्रकारचें जबाबदार नाहीं. तुमचे तुह्मी आहांत करितां तुह्मास अगाऊ कळविलें आहे आणि सदरहू नोटीशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख २३-६-९७ इसवी.

(सही)
अमृत इरभान पाटील मौजे
खडकी टाकळी तालुके
आकोला दस्तुर
खुद्द.

## आकोट जुबिली महोत्सव

(तारीख २२ जून रोजीं रावसाहेब विनायक आपाजी काणे यांनीं केलेलें संभाषण)

### महाराणी सरकारचा जयजयकार असो.

तारीख २१ व २२ जून १८९७ हे दोन दिवस जगाच्या इतिहासांत अत्यंत आनंददायक व ह्मणून चिरस्मरणीय समजलें पाहिजेत.

महाराणी व्हिक्टोरिया यांचे राज्या रोहणास ६० वर्षे पूर्ण झालीं, ह्मणून ज्या ज्या ठिकाणीं ब्रिटिश राज्यसत्ता आहे, तेथें तेथें, आणि दोस्त सरकाराचे मुलुखांतही, प्रजाजनांनीं राणी सरकारचे कल्याणार्थ महोत्सव करून ईश्वर प्रार्थना केली पाहिजे.

### इंग्रजी राज्याचा विस्तार

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, आस्ट्रेलिया, सिलोन, चीनदेशांत हांगकांग वगैरे, आफ्रिका खंडांत केप कालनी व मोठा प्रदेश, झांजिबार, ईजिप्त, अमेरिका खंडांत कानडा, व दुसरे प्रदेश, आणि पासिफिक व अतलांतिक सागरांतील असंख्य बेटें हीं सर्व ब्रिटिश राज्यसत्ते खालीं आहेत. जगाची लोकसंख्या सुमारें सव्वा अब्ज आहे त्यापैकीं ४० कोटी ह्मणजे $\frac{1}{3}$ लोक एकट्या महाराणीचे राज्यसत्तेंत आहेत व $\frac{2}{3}$ त बाकीचे अनेक राजे, बादशहा व मांडलीक आहेत. अशा प्रकारचें राज्यविस्ताराचें उदाहरण जगाचे इतिहासांत दुसरें आढळत नाहीं. आतां ही जी प्रभूची अपार कृपा झाली, तीस पात्र असण्यासारखे सद्गुण ब्रिटिश राष्ट्रांत आहे ह्मणून झाली, किंवा ती निष्कारण झाली हें आपण पाहूं.

महाराणी विक्टोरिया,

राणी सरकार अत्यंत वैभवशाली तर आहेतच, पण त्या पहिल्या प्रतीच्या सद्गुणी आहेत त्या विद्या आणि ज्ञान यांनीं विभूषित असून कोमल अंतःकरणाच्या आहेत यामुळें त्यांचे अंतःकरण हें भूतदयेचें केवळ वसतिस्थानच आहे.

त्यांचे ६० वर्षांचे कारकीर्दींत प्रजाजनांस कोणते अलभ्य लाभ झाले तें आपण पाहूं. ह्यांच्या कारकिर्दींत प्रवाससाधनें, ह्मणजे सडका, रेलवे व आगबोटी सुलभ झाल्यामुळें व्यापाराची वृद्धी झाली व ठग व डाकू लोकांचा या साधनामुळें बऱ्याच अंशीं आपोआप मोड झाला. विद्येचा प्रसार झाला. लोकांच्या सामाजिक स्थितींत इष्ट प्रकारचा फेरफार झाला. लोकांचें जीवित आणि मालमत्ता यांचें संरक्षण चांगल्या प्रकारें होत आहे, धर्म संबंधानें लोक आपआपल्या समजुती प्रमाणें वर्तत आहेत. वर्तमान पत्राचा विलक्षण फैलाव होऊन तीं लोकांचें ज्ञान वाढविण्यास कारणीभूत होत आहेत, टपाल खात्याची वृद्धी आणि सुधारणा इतकी झाली आहे कीं तिचें वर्णन पूर्णपणें करितां येणें अशक्य आहे. त्यापासून किती व कोणते लाभ झाले व होत आहेत याची कल्पना प्रत्येकानें आपल्या मनाशींच करावी. तारायंत्रानें तर सर्व भूगोल वेष्टित झालेला आहे.

ब्रिटिश राज्या पासून या सर्वांपेक्षां अधिक अशा सर्व जगास लाभ झाला आहे, तो कोणता ह्मणाल तर दास किंवा गुलाम यांची मुक्तता. स्वतःस कांहीं लाभ नसतां असंख्य जीव खर्ची घालून आणि अपरमित धनाचा व्यय करून महाराणी सरकारानें जगांतील गुलामांचा व्यापार आणि दास विक्रय बंद केला. बलवानानें दुर्बलास दास करून त्यास जन्मपर्यंत परतंत्रतेंत ठेवून जनावरापेक्षां वाईट रीतीनें वागविणें हें पाषाणहृदयीं, कठोर मनाचे व क्रूर लोकांचें काम आहे. तरी अशी असंख्य कुटुंबें ह्या स्थितीस प्राप्त झालीं होतीं. मनुष्य प्राण्यास अकस्मात उचलून त्याचे प्रिय आप्तवर्गाची पुनः भेट होणार नाहीं अशा शेंकडों कोसांवर नेऊन त्यांस बाजारांत विकणें, व त्यांचें पुढील सर्व आयुष्य दुःखांत, हालांत, व विपत्तींत, जाईल असें करणें हें सदयांचें अंतःकरण विदारून टाकतें. पण अशीं उदाहरणें अगणित घडलीं आहेत ह्या दुःसहस्थितीचा, जलमार्गावर आणि खुशकीवर, वैभवशाली व उदारचरित राणीसरकारानें एकदाच शेवट करून टाकला.

पूर्वी राजे, व सार्वभौम, कसे जुलमी होते, कसे बेबंद होते, किती क्रूर, निर्दय, व ज्ञानशुन्य होते ह्या गोष्टीची जे आह्मी लोक आज शांततेनें कालक्रमणा करीत आहों, त्या आह्मांस कल्पनाही करितां यावयाची नाहीं यास्तव त्यांचें थोडें दिग्दर्शन करणें अवश्य आहे.

उदाहरणार्थ ब्रह्मदेशाचा थीबा राजा यांचें चरित्र पहा. यांनीं प्रजेवर अपरमित जुलूम केला त्या सर्वांचें येथें निरूपण करणें अशक्य आहे. जुलुमाचें एकच उदाहरण पुरे आहे हे गादीवर बसले तेव्हां आपली भीति व आपणास होणारा अपाय यांचें निवारण करण्या करितां यांनीं राजकुलांत उत्पन्न झालेल्या अनेक राजपुत्रांचे व राजकन्यांचे व इतर मुत्सद्यांचे गळे चरचर कापून त्या सर्वांची कत्तल उडविली. ह्या महत्पापाचें प्रायश्चितही त्यांस लागलेंच मिळालें.

अशा प्रकारचे राजे संस्थानिक ह्या आपल्या देशांत व इतर देशांत पूर्वी अनेक होते ते हिंदुच होते किंवा मुसलमान होते असें आमचें ह्मणणें नाहीं. कांहीं हिंदु राजे व मुसलमान राजे न्यायी व सद्गुणी होते, परंतु वाईटांची संख्या जास्त होती. कायदेकानू, योग्य बंदोबस्त, व विद्यावृद्धी नसल्यामुळें ईश्वर कृपेनेंच केवळ कांहीं न्यायी राजे केव्हां केव्हां निपजत, पण वरील योग्य साधनांचे अभावामुळें स्वेच्छाचारी व जुलमी राजांची संख्या फार असे.

आणखी या राज्यांत एक मोठा लाभ झाला. तो सती जाण्याची बंदी हा होय. याचे विस्तारानें कथन करणें आवश्यक दिसत नाहीं.

तसेंच दुसरें जे असंख्य लाभ झालेले आहेत त्यांचेंही प्रस्तुत प्रसंगीं निदर्शन करणें जरूर नाहीं.

राजकीय हक्कास कसें पात्र व्हावें व ते राज्यकर्त्यांच्या सद्इच्छेनें कसे संपादन करावे हें देखील आह्मास याच कारकीर्दीत समजलें. तेव्हां राज्यकर्त्यांस नाखुष न करतां त्यांच्या कृपेचा आपण अनुभव घेऊं लागणें हें आपलें अत्यंत पवित्र असें कर्तव्य आहे.

आमचा देश वास्तविकपणें महाद्वीप आहे याच देशांतील निरनिराळ्या प्रदेशांतील लोक परस्परांस पूर्वी शत्रु समजत होते ते आतां इंग्रजांच्या सहवासानें त्यांच्या विचारांचे, कल्पनांचें अणुकरण केल्यानें मित्र समजूं लागले आणि त्यांचें ऐक्य होऊं लागलें. हा कशाचा परिणाम आहे.

भूगोल, इतिहास, नैतिकग्रंथ, यांचे अभावामुळें प्राच्यराष्ट्राची पूर्वी अशीच उदासीन पद्धति होती ती पाश्चात्य ज्ञानानें बदलली आणि हा एक अमोलिक लाभ झाला आहे.

हिंदुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच काय? जगाच्या एका टोकापर्यंत सुयंत्र व शांततेनें राज्य चालविण्याची पद्धति राजनीतिकुशल राष्ट्रां वांचून साध्य होणार नाहीं. आपापल्या प्रदेशांतील, तुक-

डीतील पूर्वींच्या राज्यपद्धति विषयीं कोणी ढोल मिरवूं लागेल तर तो केवळ पोंकळ ढोलच समजला पाहिजे.

स्त्रियांस विद्येचा लाभ व्हावा, व त्यांची उन्नति व्हावी ही नवीन कल्पना व हा नवीन लाभ आहे.

शहरें, रस्ते, घरें, विहिरी, तलाव व नद्या, सरोवरें हीं स्वच्छ राखावीं भक्ष्य व पेय पदार्थ स्वच्छ व शुद्ध राखावे ह्याही नवीन कल्पना व हेही नवीन लाभच आंहत.

सारांश अशा आनंददायक सहस्त्रावधि गोष्टींची प्राप्ति झाली आंहे.

आतां अशा अफाट व अवाढव्य राज्यविस्तारांचें प्रचंड यंत्र चालत असतां त्यांत केव्हां केव्हां जे प्रमाद घडतात त्यांचा दोष राणी सरकारावर नसून तो केव्हां केव्हां व्यक्ति विशेषांवर असतो व कधीं तो नैसर्गिक असतो.

आतां हा हिरक महोत्सव लोकांनीं कां करावा ह्मणून कोणी प्रश्न करणार नाहीं असें वाटतें तरी कोणी केलाच तर उत्तर हेंकीं संसारांत आपणास कांहीं सुखाच्या गोष्टींची प्राप्ति झाली किंवा आपल्या कांहीं अडचणी दूर झाल्या तर आपण कृतज्ञबुद्धीनें प्रभूचे आभार मानितो, मग जगांतील एवढ्या विस्तृत प्रदेशावरील राज्यकर्त्री, इतकी सदय, इतकी उदार, आणि सर्व गुणांनीं युक्त अशी, सदय प्रभूचे अशीर्वादानें आपणास मिळाली, ह्मणून आपण ह्या महाराणीच्या कल्याणार्थ मनोभावानें त्या प्रभूची प्रार्थना केलीच पाहिजे, आणि हो प्रार्थना ह्मणजेच "ही रक महोत्सव" "रत्नमहोत्सव" किंवा "डायमंड ज्युबिली" होय.

पुन्हा महाराणी विक्टोरियाचा जयजयकार असो अशी सूचना या भव्य समाजास करून मी आपली रजा घेतो.

---

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य १४ शके १८१९

---

# अंतःकरणा पासून मी माझ्या आवडत्या जनाचे आभार मानते. ईश्वर त्यांस सुखी ठेवो.

हा आशीर्वाद चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआ सरकार यांनीं आपल्या प्रजाजनांस पाठविला आहे. हा निरोपच ह्यांच्या प्रेमळ, सदय व उदात्त मनाची साक्ष देतो. महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या मनांत फार अनुपम व अदृष्टपूर्व प्रजावात्सल्य आहे. त्यांनीं प्रजाजनांशी मातृत्वाचें नातें अगदीं सलगीनें व आनंदभरानें व्यक्त केलें आहे. अशीर्वचन सरोवर त्याच्यों पवित्र व ईश्वरनिष्ठ मनःस्फूर्तीनें ओतप्रोत रंगलें आहे. त्यांचा आशासमुच्चय प्रजेला सुखी ठेवण्यांत संकलित झाला आहे आणि ह्मणून अद्वितीय राज्यवैभव विसरून प्रजेच्या सुखासाठीं श्रीमती व्हिक्टोरिआ निरभिमानें व अनन्यभावानें ईश्वराला आळवीत आंहत.

हा निरोप अगदीं साधा आहे तरी अर्थगांभीर्यानें व प्रासादिक गुणानें अगदीं हृदयंगम आहे. हा चिरस्मरणीय राहील. आणि या आशीर्मित्रावरच आह्मी इंडियन लोक राजभक्तीनें आपल्या सर्व भावी वैभवाची इमारत उभारत आहों. परमेश्वर महाराणी सरकारच्या शद्बाची सार्थकता करील यांत कांहीं शंका नाहीं. ईश्वरी अंशाच्या श्रीमती व्हिक्टोरिआ आहेत तेव्हां ह्यांच्या मुखांतले ईश्वरी प्रेरणेचे शद्ब ईश्वराला खरे केलेच पाहिजेत.

हा आशीर्वाद मनोभावानें शिरसावंद्य करण्यासाठीं आह्मी सर्व लोकांस विनाविनों. प्रजेचें अभीष्ट चिंतण्यांत निमग्न अशा महाराणी सरकार दीर्घायु, सुखी व वैभवशाली होवोत अशी परमेश्वराजवळ आह्मी सविनय प्रार्थना करितों. मग तुकारामांच्या साधूक्तीप्रमाणें:—

सत्य संकल्पाचा दाता भगवान ॥
सर्व करी पूर्ण मनोरथ ॥

## राज्ञी महोत्सव.

श्रीमती व्हिक्टोरिया चक्रवर्तिनी हिंदुस्थानची बादशाहिणी यांचे राज्यास साठ वर्षें पूर्ण झाल्यामुळें गेल्या ता. २१।२२ जून रोजीं सर्वत्र जुबिली उत्सव फार मोठ्या थाटानें व आनंदानें करण्यांत आले. राणी सरकारचे उदार व प्रेमळ अंतःकरण, आपल्य प्रजेविषयीं त्यांची अत्यंत कळकळ, व प्रजेचें सुख तें आपलें सुख व प्रजेचें जें दुःख तें आपलें दुःख असा जो त्यांचा सुस्वभाव हीं हिंदुस्थानांतील आबालवृद्धांच्या हृदयांत पक्की खिळून गेल्या मुळें, यंदा सर्व ठिकाणीं भयंकर दुष्काळ, दारुण धरणी कंपामुळें झालेले अनर्थ, ब्युबानिक प्लेग सारखे प्राणहानी करणारे रोग या मुळें अतोनात नुकसान व प्राणहानी होऊन सर्व हिंदुस्थान देश विपत्तींत निमग्न असतांही, सर्वांनीं मोठ्या उत्साहानें व आनंदानें आपआपल्या शक्त्यनुसार लहान मोठे समारंभ करून आपली राजनिष्ठा व कृतज्ञताबुद्धी हीं दार्शित केलीं श्रीमती चक्रवर्तिनींच्या राज्यांत तिची प्रजा शांततेच्या वेळीं ज्या ज्या सुधारणा शक्य आहेत त्या सर्वांचा सुखानें उपभोग घेत आहेत.

अकोलें येथेंही सदहु महोत्सवानिमित्त ता. २१ रोजीं प्रातःकाळीं ८ वाजतां येथील अनाथगृहांत मोठा समारंभ करण्यांत आला. एक मोठा शामिआना उभारला होता व बाजूनें पुष्कळ निशाणें फडकत होतीं. सर्व युरोपिअन व नेटीव सरकारी अंमलदार, वकील, व्यापारी वगैरे लोक बरोबर ७॥ वाजतां आपआपल्या जागीं बसल्या नंतर मि. प्रिडो साहेब येथील लोकप्रिय डेपुटी कमिशनर यांणीं अध्यक्षस्थान आपल्या प्रिय पत्नी सह सुशोभित केलें. नंतर येथील पुढारी व सन्माननीय रावसाहेब देवराव बाबा वकील यांणीं श्रीमती चक्रवर्तिनी बादशाहीणीच्या राज्यांत आपणास कसकशी सुखाची प्राप्ती झाली व राणी साहेबांचे पुष्कळ गुणानुवाद वर्णन करून राणी सरकारचे राज्याविषयीं आपण किती ऋणी व राजनिष्ठ आहोंत हें व्यक्त करून दाखविलें त्या वेळीं आनंदाचा टाळ्या सर्वांनीं प्रेमळ अंतःकरणानें दिल्या. नंतर मिसेस प्रिडोसाहेब यांचे हस्तें अनाथगृहांतील अती दीन लोकांस वस्त्रें वाटण्यांत आलीं मि. प्रिडो यांचें समयास उचित असें थोडें भाषण झाल्यावर पान सुपारी. अत्तर गुलाब वगैरे देऊन जमलेल्या सर्व मंडळीचा व अनाथ गृहांतील गरीबांचा फोटो घेण्यांत येऊन मंडळी आपआपल्या घरीं राणी साहेबांचें गुणानुवाद वर्णन करीत व महाराणीसाहेबास अभीष्ट व आयुष्य चिंतीत गेलें. दोन प्रहरीं बरोबर ४ वाजण्याचे सुमारास मि. अजिजुद्दीन सा. अ. क. यांचे देखरेखी खालीं जुबिली पार्क मध्यें शर्यती वगैरे अनेक करमणुकीचे खेळ होऊन गरिबांस मिठाई व पैसे वाटण्यांत आले. गोऱ्या लोकांच्या फलाहाराची योजना होती व नेटिव्ह लोकां करितां चहा काफीचा बंदोबस्त ठेवण्यांत आला. मि. शेख इसमाईल ए. अ. क. यांणीं शहरांतील पेठेंतील मुसलमान लोकांस खाना दिला दुसरें दिवशीं सर्व प्रसिद्ध व विख्यात गिरणीवाले मि. मूळजी जेठा यांणीं सर्व जातीचे तीन हजार लोकांस पक्वान्नांचें जेवण दिलें. याबद्दल सदहू उदार गृहस्थ स्तुतीस पात्र आहेत. या अन्नदानाच्या समारंभा प्रीत्यर्थ खुद्द प्रिडो साहेब उमरावतीस जाण्याचा बेत रहित करून मुद्दाम आले होते आणि त्यांच्याच रूपें मुळें हा मोठा खाना देण्याचा योग सफल झाला.

आकोल्यास सुमारें दोन हजारावर लोकांची सभा भरली होती. दीपोत्सव, व इतर आनंददर्शक गोष्टींनी तें लहान शहर अगदीं गजबजून गेलें होतें. त्या वेळचें अध्यक्षांनें भाषण आह्मी निराळें पाहिल्या बाजूवर दिलें आहे. प्रत्येक ठिकाणीं हा जुबिलीचा महोत्सव करण्यांत आला.

मे. आर. आबर्ड, जुडिशिअल कमिशनर यांनीं जुबिलीच्या उत्सवा निमित्त आपल्या बंगल्यावर फलाहाराची मेजवानी दिली. न्याय खात्यांतील अधिकारी व वकील लोक यांस आमंत्रण होतें. साहेब बहादुरांनीं जमलेल्या मंडळीचें स्वागत मोठ्या आनंदित मुद्रेनें व कळकळीनें केलें. मंडळीच्या करमणुकी साठीं विशेष योजना केल्या होत्या. वाशिमकर नाटक मंडळी कडून निरनिराळे वेचें करून दाखविले. सर्वांचा आदरसत्कार मोठा नामी झाला.

---

सुकृतीनें पतित पावन होतात. शूद्र वर्ग आमच्या समाजरचनेंत अगदीं खालचा आहे. तथापि सुकृतीचा महिमा कांहीं विचित्र आहे आणि त्यामळें शूद्र देखील उच्चतर वर्गातल्या मानपानाच्या अधिकाराला पोचतो. आमच्या शहरीं राजमान्य राजश्री जानू पचरू महार हे गृहस्थ आपल्या उदार कृत्यांनें मोठेपणाला चढले आहेत. हे आपल्या हिंमतीवर श्रीमान झाले. व महार मंडळींत चांगल्या नांवा लौकिकाला पोचले. दरसाल महारमेळा भरत असतो तो त्यांच्याच आश्रया खालीं चालतो. आपल्या वर्गातील लोकांस विद्येची व सद्गुणाची अभिरुची लागावी ह्मणून यांनीं यथाशक्ति सतत प्रयत्न चालविला आहे.

हे मूळचे पारसचे राहणारे. सुमारें वीस बावीस वर्षांमागें हे रिड नांवाच्या साहेबाबरोबर सिलोन येथें कंत्राटाचीं कामें करण्या साठीं गेले होते. आपल्या घरच्या मंडळीस त्यांनीं तिकडून ५०० रुपयांची मनीआरडर पाठविली ती हल्लींच्या कमिशनर साहेबांचे बंधु मि. बुलक आकोल्यास डिपुटी कमिशनर असतांना त्यांच्या पत्यावर आली तेव्हां सर्व लोकांस राजश्री जानू महार यांचें आश्चर्य वाटलें. सारांश स्वतंत्र धंदा करून हे सुस्थितीला आले. महार मंडळींत असा हिंमतवान पुरुष विरळा!

विद्यार्जनाचा लाभ स्वतांस नाहीं तरी त्याची किंमत राजश्री जानू हे ओळखून आहेत. त्यांनीं येथील खोलेश्वराच्या मंदिरासमोरील मैदानांत एक रम्य इमारत बांधली आणि महार वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीं बोर्डींग ह्मणून ही इमारत बांधली आहे. तिच्या प्रीत्यर्थ निदान तीन हजार रुपये खर्च लागला असेल. तिचा प्रवेश समारंभ गेल्या बुधवारीं मोठ्या थाटानें झाला. अध्यक्षस्थानीं मि. प्रिडो साहेब होते. त्या दिवशींची ती सर्व शोभा व दीपोत्सव पाहून या उदार कृत्या बद्दल सर्व जण आनंदानें राजश्री जानबा महार यांचें अभिनंदन करीत होते. हल्लीं या बोर्डिंगांत बारा विद्यार्थी असून त्यांच्या विद्यार्जनाचा खर्च वरील धर्मात्मा करीत असतो. मंगल कार्यं नेहमी कर्त्याची कीर्ती पसरतात या न्यायानें राजश्री जानबा महार यांचें नाव चिरकाल चालेल असें आह्मी इच्छितों.

---

## *पुण्याचा अनर्थ

पुण्याचे लेफटेनंट एअर्स्ट व मि० रांड हे उभय गृहस्थ गेल्या २२ वे तारखेस गव्हरनर साहेबांच्या बंगल्यावरून रात्रौ बारा वाजतां परत येत असतांना कांहीं मारेकऱ्यांनीं त्यांच्या गाडी मागें चढून त्यांस गोळी घातली. लेफटेनंट एअर्स्ट हे थोड्या तासांनीं मरण पावले. व मि० रांड साहेब फार आजारी आहेत. लेफ० एअर्स्ट हे चुकीनें लेफ० आवेन लेविस यांच्या गाडींत बसल्यामुळें लेफ० लेविसच्या ऐवजीं मारेकऱ्यांकडून मारले गेले असें सांगतात. रात्रीं काळोख पडला होता, व बंगल्याच्या बाजूला दारूकाम उडत होतें तें पाहण्यासाठीं लोकसमूह मोठा जमला होता ह्मणून दुष्ट मारेकरी सांपडले नाहींत. त्यांच्या शोधासाठीं सरकारांतून २० हजार रुपयांचें बक्षीस लावण्यांत आलें आहे. मि० रांड हे वाईस असतांना त्यांनीं तिकडे लोकांची अप्रीती संपादली होती आणि पुण्यास प्लेग कमिटीचे मुख्य असतांना पुष्कळ चांगला बंदोबस्त केला पण लोकांची मनें अती दुखविलीं होतीं असें म्हणतात त्यांस जोडगोळी प्लेग कमिटी मध्यें लेफ० ओवेन लेविस याची होती. म्हणून या दोघांवर हल्ला करण्याचा बेत मारकऱ्यांनीं केला होता असा तर्क बसविला आहे. एकंदरीनें पुण्यास ही मोठी वाईट गोष्ट घडली व त्याबद्दल सर्व देशास हळहळ वाटते. आंग्लो-इंडियनांच्या वातावरणांत अनेक कु-

र्तक निघतात हे पाहून विशेष वाईट वाटतें. मि. रांड यांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर लोकांचीं मनें चिथवलीं आणि त्यामुळें हा खुनाचा प्रकार प्रत्यंतरास आला अशी गोष्ट असली तरी त्याचा दोष थोर गृहस्थांवर फोडण्याचा प्रयत्न करणें म्हणजे नैतिकदृष्ट्या त्या मारेकऱ्यांच्या वर्गांत जाऊन बसण्या प्रमाणेंच आहे.

The Berar Samachar

MONDAY JUNE
28 1897

The Diamond—Jubilee passed off very successfully in all parts of the Indian empire except in portions where the shocks of the earth—quake had devastated cities and villages either in Bengal or Assam. It is a matter of great pleasure to learn that in Great Britain the Jubilee—rejoicings were most unique and unparalleled in the history of the world. In human calculations such a jubilee is a rare blessing of God and we are extremely delighted to see that Her Majesty the Queen-Empress of India is the chosen favorite of God in connection with this gift. We give below the felicitous and gracious message sent by Her Majesty to all her people in the world.

**FROM MY HEART I THANK MY BELOVED PEOPLE MAY GOD BLESS THEM**

Let us devoutly and loyally pray to God that she should be blessed with long life, sound health and His rarest gifts.

The people of Akola have celebrated the diamond jubilee in rather a practical and highly useful manner. Our popular and energetic Deputy Commissioner did not press for any pompous display. To feed and clothe the poor was the central pivot of our rejoicings on this occasion. Mr. Prideaux did even forego the pleasure of a trip to Amraoti to complete arrangements in this connection. Sports were most nicely got up under the secretaryship of our energetic officer Mr. Azizuddin. Mr. Laxman Gopal, Tehasildar of Akola was a great and sure help in making the programme of feeding and clothing the poor people a pleasant success. Mr. Sheikh Ismail has also contributed a good deal to make this success more successful. The agent of the Mulji Jetha's Oil—mill moved his master to feed one day with good food all those who would have recourse to a public charitable dinner. We thank most heartily these public—spirited and generous people who celebrated the diamond—jubilee of Her Majesty by liberal donations of food and clothes to Her famine—stricken subjects.

**A GREAT DISAPPOINTMENT.**

The Jubilee honors list which was long expected has at length been out. It is neither full nor comprehensive. There are at least half a dozen persons in Berar whose names were perhaps first looked for by numerous readers, for their claims to public honours have been long recognised and freely acknowledged. The only province which has been well recognised is Bombay. Honors befitting exalted offices are given to the heads of different administrations and we are disappointed to find Col Bar and Mr. Plowden omitted Though Messrs C G Lyall, R. G. Crosthwaite and Macworth Young have been conferred Knighthoods. The Government have recognised the services of their Chief Secretaries by elevacting them to Companionships The Commissioner of Hyderabad Assigned Districts, the first Assistant to the Agents, to the Governor General and to the Resident and Divisional Commissioners particularly of the central Provinces occupy no less important positions. Their situations are anomelous unpleasant and always misunderstood We are only surprised to see that the Government of India found only C. I. E. ship for our worthy Commissioner Mr. Bullock. Mr. Obbard our most admired Judicial Commissioner whose sound views on every new legistature proposed lend a helping hand to the *Legislative* body is entirely lost sight of. This much with regard to European officers and European gentry who have almost monopolised the long expected honours.

The list is infinitely meagre when we look for our eminant brothren in India. Show as much loyalty as you can, give as much help as you can to the administration, come forward with your purse and body to the help of the Government who have notoriously been in financial difficulties, and be prepared to be slighted, ignored and even despised, even on the most auspicious and memorable occasions. There are at least half a dozen native gentlemen in Berar, and Rao Sahib Dewrao Vinayak in particular whose omission we certainly feel as a personal slight.

But we have not much to feel when we reflect that men like the Hon'ble Mr Bhuskute from the Central Provinces have also been passed over. In fact only two native nonofficials of the Supreme Council have been selected for one or the other of the Orders. The Nawab of Lohara has been conferred a K. C. and VidiaVinodh the Hon'ble Rai Bahadur P. Ananda Charlu a C. I. E. Ria Bahadur Ananda Charlu ought certainly to have been conferred this distinction very long ago. It may be a proper saying "better late than never" But if this Monday honor were never given him posterity would at least have had before them one other conspicuous example of a life devoted exclusively to public uulity and yet unappreciated by our Government.

The Central Provinces by their neighbourhood are more nearly connected with us and we are as keenly interested in them as in ourselves. We were indeed grieved to find that no recognition should have been made of any of the Chhatisgad feudatory chiefs. The Hon'ble Rao Sahib Bhuskute, the Raja of Mukrai are the most important landed proprietors in the Narmada Division and Raja Gokuldas in Jubbulpore Division. Government found honours for none of these though in the present times these persons are doing heroic service with their person and money to mitigate the famine distress. No doubt every Deputy Commissioner in the Centrl Provinces and the Divisional Commissioners of Jubbulpore and Narbada Division and Chief Commissioner Sir Charles Layal are exersising every means in their power to save the people as well as to ensure next year's cultivation. But the contribution of these persons can by no means be ignored

In the metropolis of the C. P., we mean Nagpur, we have men like Mr. Rajaram Sitaram Dixit., Mr. Booty, Mr. Wamanrao Kolhatkar and several others. It is probable the C. P. list is by no means complete as the Famine there has not yet died and as we might reasonably expect the services of these persons recognised sooner or later.

But we can not conceive any reason as to why men like Messrs Khaparde, Joshi, Mudholkar and others should not yet have got their dues. The services of Rao Saheb DeoRao Vinayak to the Berar public have been varied, untiring and constant. His views have ever been considerate. His services to the administration have been likewise conspicuous and we are indeed very sorely disappointed to note his omission. Let us however hope the ground for complaint will soon disappear.

The Commissioner has taken a careful retrospective view of the effects of the mark—system in provinical—jails. It runs thus:—

"The mark system seems to be working well, and from my inspection the registers seems to be carefully maintaineb, though perhaps left too much to the clerical establishment. It would be strange if prisoners did not recognise the value of good conduct under a system so favourable to their released; and I am inclined to think that Dr. Roe, the Superintendent of the Amraoti Jail, is right in his estimate of the effects of the system and conduct and jail discipline and in his opinion that the discipline of the present day is altugether better than it was ten years ago. But my impression from inspection of the registers was that marks were given too easily—that is; as a matter of course—and that a little more might be expected of a prisoner in the way of industry and good conduct before the marks are earned. As the system stands, almost every prisoner who is entitled to come under the mark system gets his marks as a matter of course, the result being a certain definite curtailment of his sentence with little or no effect on his part. To ensure the fulfilment of the object of the system, *viz.* an improvement in behaviour, discipline, and industry, there should be some incentive to effect, and I agree with Dr. Roe that Superintendents should be given larger powers to fine marks, and I should like, if possible, to see marks depend more on specially good conduct and industry. At present I think marks are earned too easily."

## वऱ्हाड

हवामान— पाऊस नाहीं ह्मणून लोक घाबरून फार गडबडले आहेत वारा सोसाट्याचा वाहतो पण पर्जन्याची आशा दूरावत चालली आहे. बाजारभावाच्या तेजीमुळें दुष्काळाचा कडाखा विशेष आहे. हंवचा उपद्रव चालूंच आहे. इतर रोगराई देखील बलावत आहेत.

आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं मि० फ्रेडरिक शोअर बुलक. कमिशनर साहेब यास 'सी. आय. इ.' हा किताब ज्युबिलीच्या आनंदसमयीं देण्यांत आला.

आणि ह्याचप्रमाणें मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं मि० अहमद अली पेशनर एक्स्ट्रा असिस्टंट कॉनसरव्हेटर यांस 'खान बहादूर' आणि रा० रा० गणपत बाबाजी सहस्त्रबुद्धे बी० ए० ए० असि० निसबत रेसिडेंट हैदराबाद यांस 'राव साहेब, अशा पदव्या देण्यांत आल्या.

वऱ्हाडांतील गॅझीटेड पोलिस आफिसर आहेत त्या पैकीं जे मराठी भाषेच्या परिक्षेंत उत्तम प्रतीचे ठरतील त्यांस १००० रुपये बक्षीस देण्याविषयीं सरकारी ठराव झाला आहे.

गेल्या सालच्या फेब्रुरवारी महिन्याच्या यादींत फेरफार करून वऱ्हाडांतील न्यायाधीशांचे कोर्टासंबंधी अधिकार व्यक्तिमात्रा संबधानें नव्यानें निर्णीत करण्यांत आले आहेत.

खालील विद्यार्थी परीक्षेंत लायक ठरल्या वरून त्यांस हैदराबाद येथील हास्पिटल असिस्टंटच्या वर्गांचे घेण्यांत आले:—बाबू सखाराम, गणेश सखाराम, गणेश काशिनाथ पारपे, वामन कृष्ण, गंगाधर विसाजी, नागो बळवंत कर्डेकर, काशिनाथ अमृत, व नारायण केशव गोळे.

वऱ्हाडांतील बारा मुनसिपाल कमिट्यांस लागू करण्यासाठीं कोंडवाड्याचे तपासणीचे व व्यवस्थेचे नियम नवीन करण्यांत आले आहेत.

वऱ्हाड प्रांतांत एप्रिल महिन्यांत ९६५७ माणसें जन्मलीं व ७८३९ मरण पावलीं.

## आकोला बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९३ रुपये |
| जवारी | १२२ रु० |
| गहूं ( कांठे ) | १३० रु० |
| ,, ( बनशी ) | १५० रु० |
| चणे | १३० रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ८॥= मण |
| सोनें | २५ तोळा |
| चांदी | ८३ |

जाहिरात

सजाई मर्द सिताराम मोहोडे जात कुणबी रहाणार मौजे धाब तालुके अकोले इनकडून सर्व लोकांस व सिताराम वा रायभान मोहोडे राहणार मौजे पनोड तालुके दर्यापूर यास आणि ज्या ठिकाणी याचे आप्त वर्ग राहत असतील याना कळविण्यांत येतें कीं माझे लग्न होणेस सोळा वर्षे झालीं लग्नाचा नवरा सिताराम हा दाहा बारा वर्षां पासोन कोठें गेला न कळे मग तो मैत झाला अगर जिवंत आहे किंवा काय झालें या बद्दलची कोणतेच प्रकारें त्याज विषयीं खबर कळत नाहीं. यामुळें मी आपले आईबापाचे येथें राहून अन्न वस्त्राचे हाल भोगत आहे, या साठीं वर लिहिल्या प्रमाणें सर्वांस कळविलें जातें कीं सिताराम यांनीं मजला आपले येथें घेऊन जावें किंवा त्याचे आप्तांनीं किंवा त्याची ज्यांस खबर असेल त्यांनीं आज तारखे पासोन पंधरा दिवसांत मला कळवावें या प्रमाणें न झाल्यास मी दुसरा विवाह करीन मग मी अगर मज बरोबर पाट लाऊन घेणारा हा अपराधास पात्र होणार नाहीं कळावें ता. २४।६।९७ इसवी.

( सही )

निशाणी सजाई मर्द सिताराम

इपी.

## वर्तमानसार.

मुंबई म्युनिसिपालिटी आरोग्यरक्षणार्थ २६ लाख रुपये ४० वर्षांच्या करारानें ३॥ टक्यांच्या व्याजानें कर्ज काढीत आहे.

२८ जून रोजीं मुंबईस टाउनहालांत होणाऱ्या मुन्सफीच्या व हैकोर्ट वकिलाच्या परिक्षेस ८२ उमेदवार असून नुसत्या वकिलीस ७३९ आहेत.

फ्रेंच प्रेसिडेन्ट रशियाकडे गेल्यावर उभय सरकारांच्या दरम्यान एक नवा करार होणार आहे.

३०० शिपायी, १२ स्वार व २ तोफा इतक्या फौजेच्या सरकारच्या एका टोळीवर डोंगरी लोकांनीं हल्ला करून तिघां इंग्रज आफिसरांस ठार करून दुसऱ्या तिघांस घायाळ केलें व २४ शिपायी ठार करून २५ घायाळ झाले अशी जी एक बातमी गेल्या अंकांत प्रसिद्ध झाली त्याबद्दलचा विशेष तपशील आतां बाहेर आला असून त्या त्या हल्ला करणाऱ्या लोकांस शासन करण्या करतां सरकारची एक मोठी फौज रवाना होत आहे असें समजतें.

सगळ्या हिंदुस्थानांत ताबुतांचा सण शांतपणे पार पडला.

दक्षण पर्शियांल्या महमरलच्या सेखची कत्तल झाल्याची बातमी आहे हा तंटेखोर होता, कारण कुरण नदींतून इंग्रजांचा व्यापार चालू करण्यास त्याणें फार हरकत केली होती असें सांगतात.

हिंदुस्थांतल्या नेटिव संस्थानांतल्या दुष्काळ कामावर हल्लीं ३॥ लाख माणसें आहेत.

लाहोरास एक साहेब प्रोफेसर आहे. तो एके दिवशीं सकाळीं निजून उठून बाहेर आला तों त्याचा घोडेवाला पुढें आला आणि आपल्या घोड्याचा टोणगा झाला असें सांगूं लागला. साहेबास आश्चर्य वाटलें व तबेल्यांत जाऊन पाहातो तों खरोखरीच घोड्याच्या जागीं घोडा नसून घोड्याच्या दवासण्यानें एक टोणगा बांधलेला आहे असें पाहून आश्चर्य वाटलें, पण जादूनें घोड्याचा टोणगा झाला हें ह्मणणे त्यास नाकबूल झालें. पुढें पोलिस तपास सुरूं झाला व कांहीं चोर टोणगा चोरून नेतें असतां त्यांस साहेबाचा घोडा आढळला तेव्हां टोणग्यास नेण्यापेक्षां घोड्यास नेणें बरें असें त्यांस वाटून त्यांणीं टोणगा बांधून घोडा नेला असें आढळलें!

काफरी लोकांनीं उचल केल्यावरून काबुलच्या अमिरानें आणखी दोन पलटणी काफरीस्थानांत पाठविल्या आहेत.

निझामांचे मुख्य सेक्रेटरी मि. ह्यारमसजी वकील हे व दुसेर निझामांच्या राज्याचे शत्रु आहेत अशा प्रकारचे जाहिरनामे लोकांनीं शहरांत लावले होते व मि. वकील यांस निझामानें आतां चाकरींतून काढून टाकलें असें समजतें.

कानपूरच्या कोतवालानें हत्तीवरची ताबुताची स्वारी चोकांतून नेण्याची मनाई केल्या वरून तेथील लोक नाखुष झाले व गडबड न होण्याची खबरदारी घेण्याकरतां अधिकाऱ्यांस लष्करी लोक आणणें भाग झालें. स्वारी चौकांतून जाती तर काय होतें?

अद्भुत चमत्कारः—नलाल खेडा या ठिकाणीं एक अद्भुत चमत्कार झाला. येथें सामगंगा आणि वशिष्ठा या दोन नद्यांच्या संगमावर एक श्री महादेवाचे देवालय आहे. महादेवाची पिंडी स्फटिकासारखी चमकणारी फारच मनोहर आहे. तारीख १९ एप्रील रोजीं एक मोठा काळ्या तोंडाचा वानर प्रातःकाळींच त्या देवळांत आला आणि त्यानें त्या महादेवाच्या पिंडेस मार्कंडयाप्रमाणें कवळून धरिलें. गांवकरी लोक पूजेकरितां आले तेव्हां त्यांनीं त्या वानरास तेथून घालवून देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु तो तेथून हालेना. लोकांनीं फारच मारहाण जेव्हां केली, तेव्हां तो मोठ्यानें रडूं लागला. अखेरीस त्याचा निश्चय पाहून लोक निघून गेले. संध्याकाळपर्यंत तो वानर तसाच पिंडि धरून बसला होता. संध्याकाळ झाल्यानंतर लोकांनीं त्याला बळेंच उचलून बाहेर टाकलें त्या वेळेस तो तेथून पुढील सभामंडपांत एक गणपतीची मूर्ती होती तिच्या चरणावर मस्तक ठेवून सर्व रात्रभर तेथें पडला राहिला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तो वानर त्याच ठिकाणीं मेलेला आढळला. हा चमत्कार पहाण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते. ठा० अ०

हिंदुस्थानांत दुष्काळ पडला ह्मणून युरोपच्या राष्ट्रांत वर्गणी गोळा होऊन सरकाराकडे येत आहे तेथें सुद्धां इंग्रज लोकांनीं आपली स्वार्थपरायणता व कोडगें स्वजातीप्रेम दाखविण्यास कभी केलेलें नाहीं. अमृतबझार पत्रिका ह्मणते कीं दुष्काळ फंडाची व्यवस्था करण्याच्या कामावर इंग्रज नोकर ठेऊन त्यांना दरमहा ६ हजार सहाशें पगार पोचण्याची सोय झालेली आहे.

दरमहा ६०० पगाराचे दोन गोरे
,, २०० ,, सात ,,
,, २०० ,, आठ ,,

शिवाय प्रत्येकास १०० रुपये घोडाखर्च देण्याची तजवीज आहे. उपाशी मरणाऱ्यां लोकांनीं धर्मदायार्थ रक्कम स्वाधीन केली त्यावर चरण्यास आपल्या गौरकायस्थ लोकांस परवानगी द्यावयाची ह्मणजे मढ्याच्या टाळूवरलें लोणी चाटणेंच होय.

क्रीटमध्यें अद्याप बंडाळी चालूं असल्याचें लंडन टाइम्सचा बातमीदार कळवीत आहे.

रत्नागिरीस चांगली सपाटून पर्जन्यवृष्टी झाली. व मजगांव, साखर वगैरे आसपासच्या गांवांत गारांची वृष्टी झाली. पेरणीचीं कामें चालूं आहेत.

पंढरपुरास चांगली पर्जन्यवृष्टी झाली. चंद्रभागेसही चांगला पूर आला होता. ह्या पावसानें पाण्याची टंचाई बरीच दूर झाली आहे.

जगांत जीं वर्तमानपत्रें निघतात त्यांकडे दरसाल ७८१२६० टन कागद लागतात असा अंदाज एका आंकडेमोड्यानें प्रसिद्ध केला आहे.

धरणीकंपामुळें नादुरस्त झालेल्या इमारती दुरुस्त करण्याचें काम झपाट्यानें चालूं झालें आहे. व या मुळें गंवडी, मजूर वगैरे लोकांचा रोजमुऱ्यांचा भाव दुप्पट वाढला आहे. रुपया रोजाशिवाय मनुष्य मिळेनासा झाला आहे.

धारवाडास पावसानें अगदीं गर्दी उडवून दिली आहे. तलावास चार फूट पाणी चढलें आहे. गांवांत पटकीचा आजार जास्त आहे. हवेंत गारठा आला असून क्षुल्लक रोगाचा जोर वाढला आहे. धारवाड जिल्ह्यांतील बहुतेक तालुक्यांत चांगली पर्जन्यवृष्टी झाली.

नगरचे कलेक्टर मे. चार्लस साहेब यांनीं दुष्काळग्रस्त अनाथ बालकांचा बाजरीचे भाकरिवर निर्वाह होत नाहीं, त्यांना दूध देण्याला गंजुरी मिळावी ह्मणून नगरास असतांना मे. कमिशनर साहेबांना लिहिलें. त्या दयासागरांना ती गोष्ट रुचली नाहीं. तेव्हां मे. चार्लस साहेब यांनीं एकवार सरकारापर्यंत पल्ला पोंचून पाहवा ह्मणून दयामूर्ती सरकारला विनंती केली. सरकारानेंही नकाराचा पाढा वाचला तेव्हां मे. चार्लस साहेबांना अत्यंत वाईट वाटून त्यांनीं सरकाराला पुनः लिहिलें कीं, अनाथ आणि अशक्त मुलांना अन्नाविणें तळमळत मरूं देण्यापेक्षां एकदम त्यांना विष देऊन मारण्याची तरी दयालु सरकारानें परवानगी द्यावी!

निर्भयपणें असा कडकडीत रिपोर्ट केल्यावर त्यांची तेथून उचलबांगडी करणें सरकारास अवश्य नाहीं कां वाटणार! दयाळु सरकार! स० वि०

आस्त्रेलियांतील एका हलवायानें रोज विकावयाच्या बर्फीच्या तुकड्यावरून त्या दिवसांतील खबरबात ते तयार करतांना अक्षरांनीं सांच्यांतून त्याच्यावर वठवून काढावयाची एक नवीन योजना अमलांत आणिला आहे गिऱ्हाईकानें फराळा करितां मिठाई घ्यावी व अगोदर त्यावरील खबरबात वाचावी; नंतर ती खावी, खाशी युक्ति !

आस्त्रेलियाचे पश्चिमेस समुद्रकांठीं पहाडांत एक अतिशय दाट जंगल आहे तें पृथ्वीच्या उत्पत्ती पासून तसेंच आहे. त्याचें उत्पन्न १२, १०००००० पौंड होईल असा अजमास केला आहे.

थेसली प्रांतांत तुर्क लोकांनीं हल्लीं अनन्वित जुलूम चालविल्याबद्दल ग्रीसनें युरोपियन राष्ट्राकडे फिर्याद केली आहे.

मोहरा सांपडल्या—जुनागड संस्थानांत किल्ल्याचे उत्तर बाजूस वाटरवर्क्स खात्यांतील मजूर जमीन खणण्याचें काम करीत असतां त्यांना एक सुवर्णाच्या मोहरानीं भरलेला हांडा सांपडला. सदरच्या मोहरा ११ व्या १२ व्या शतकांतल्या असून त्यांचें वजन एकेक तोळा आहे. व त्यावर आरबी भाषेंतील कांहीं लेख आहेत.

चीनांत पोलीसची कामगिरी स्त्रिया बजावतात. अभ्यास, संचय.

एका दुर्बिणी करितां अमेरिकेंत एक भिंग तयार केलें आहे. तें तयार करण्यास सुमारें अडीच वर्षे लागलीं. त्याचें वजन १००० रत्तल असून त्यास खर्च सुमारें साडे तीन लाख रुपये लागला आहे. न्या. सिं.

अद्भुत चमत्कार करणारा ब्राह्मण सन्यासी—अमृतसर येथें पंडित बालमुकुंद नांवाचा एक तरुण सन्यासी आहे, त्याच्यां अंगीं अद्भुत चमत्कार करण्याची शक्ति मुळचींच आहे असें दिसतें. दुसऱ्याच्या मनांत काय चाललें आहे तें सांगणें किंवा अदृश्य लेख वाचणें या गोष्टी तर हा सन्यासी सहज करितो, परंतु याहूनही आश्चर्यवह चमत्कार हा करून दाखवितो. तो इच्छामात्रेंकरून पानें, फळें, फुलें, वनस्पति वगैरे उत्पन्न करितो. जड वस्तू या जागेपासून त्या जागेवर अशा वाटेल त्याप्रमाणें इच्छेच्या केवळ जोरावर नेतो. तो अधात्री दिवे उभे करून त्यांना हेलकावेही देतो. खुद्द शरीरावरही त्याची अद्भुत शक्ति आपलें सामर्थ्य बिनचूक प्रकट करिते. त्यानें एकदां आपल्या जिव्हेला एवढा मोठा भोसका पाडला कीं, त्यांतून एक हात रुमाल आरपार ओवतां आला; नंतर त्यानें तो रुमाल काढून टाकून पुनः जिव्हेची जखम बुजवून टाकली व जीभ पूर्ववत् झाली. एकादी काठी तो हवी तेथें उघड्या भुईवर सहज उभी करितो; पण तेथें गुरुत्वाकर्षणाचें बळ व्यर्थ होतें. हें व असले दुसरे चमत्कार तो हवे तेव्हां व हवे तेथें उघड्या रस्त्यावर देखील करितो. त्यासाठीं त्याला पूर्वी कांहीं तयारी करावी लागत नाहीं. एके प्रसंगीं असें झालें कीं, हा सन्यासी एका दुकानाजवळ उभा असतांना एका गृहस्थाच्या विनंतीवरून त्यानें त्याचें हरवलेलें खिशांतलें घड्याळ तेथल्या तेथें आणून दिलें. त्यानें पहिल्यानें आपले हात धुतले. नंतर थोडेसे तांदूळ मागितले; व सुमारें दहा हाताच्या अंतरावर एक पाण्यानें भरलेला ग्लास ठेविला. सन्यासी बुवा त्या तांदुळावर कांहीं वाचीत आहेसें दिसलें; नंतर त्यांनीं ते तांदूळ सभोंवते उडवून दिले आणि डोळे मिटून तोंडावर हात ठेविले आणि क्षणभरानें घड्याळ ग्लासांत येऊन पडेल असें सांगितलें, व मालकानें जाऊन पाहिलें तों त्यास आपलें घड्याळ खरोखरच सांपडलें.

वरील चमत्कार त्यास नेहमीं करवत नाहीं. कारण त्याला त्यामुळें अतिशय श्रम होतात. गु० सू०

एका आगगाडीचें इंजन कमींत कमी नऊशें घोड्यांच्या शक्तीच्या बरोबर असतें असा साधारण नियम आहे.

पावसाळ्यांत व हिवाळ्यांत ज्या मुलांचा जन्म होतो तीं मुलें उन्हाळ्यांतल्या मुलां पेक्षां शक्तीनें कमी असतात. उन्हाळ्यांत जन्माला आलेलीं मुलें बरीच सशक्त अशीं निपजतात.

ब्रह्मी लोकांचीं मुलें बोलायला लागलीं ह्मणजे तेव्हां पासूनच विडी ओढण्यास सुरुवात करितात.

चीन देशांतील लोक स्त्रियांचे फोटोग्राफ काढणें हें कृत्य एक प्रकारचें वाईट आहे असें ह्मणतात. आपले स्त्रियाचे आपण फोटोग्राफ काढून ते घरोबर टांगण्यास जाणें या सारखी शरमेची दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं असे तें समजतात.

चांगल्या सशक्त माणसाच्या मनगटाच्या नाडीचे ठोके दर मिनिटास ७२ पडतात असें पुष्कळ डाक्टरांचें मत आहे. क.

अमेरिकेनें, दुष्काळाकरितां जमलेले धान्य विकून त्याचे पैसे हिंदुस्थानामध्यें पाठविण्याचे ठरविलें आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ०८
साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.............................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy .................. ......... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 5 JUNE 1897 NO 26
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख ५ माहे जुलै सन १८९७ इ० अंक २६

नोटीस

नोटीस बेशमी— केशव पांडुरंग रहाणार शहर उमरावती यांस जयकृष्ण श्रीकृष्ण आ० पा० आई भिवराबाई जवजे श्रीकृष्णपंत देशपांडे परगणें दर्यापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास मी आपले खानगी काम करण्या करितां कुलमुक्त्यार पत्र करून दिलें होतें परंतु तुह्मी माझे मुक्त्यारपत्र झाले दिवसा पासून कांहींच काम केले नाहीं मी तुह्मास नोकरीवरून बरेच दिवसां खालीं कमी केले व तुमचे मुक्त्यारपत्र रद्द केले आहे असें तुह्मांस तोंडी सांगितलेंच आहे परंतु जाहिर करण्या करितां ही नोटीस वर्तमानपत्र मार्फत करून कळविते कीं तुमचे मुक्त्यारपत्र मी रद्द केले आहे. तुह्मी माझे कडून कांहींच कारभार करूं नये व माझे नावावर कर्ज वगैरे काढूं नये काढल्यास त्याची जबाबदारी मजवर राहाणार नाहीं कळावें. तारीख ११ माहे जून सन १८९७ इ०

( सही )

जयकृष्ण श्रीकृष्ण आ० पा० आई जवजे श्रीकृष्ण देशपांडे परगणें दर्यापूर याची खुद्द हातची असें.

---

नोटीस

गंगी मर्द पामु बगाडे माळी राहणार सुकळी तालुका जळगांव जिल्हा आकोला ईस खालीं सही करणार पामु वल्लद रामजी बगाडे माळी राहणार वाडी नजीक माहोगी ता. मलकापूर जि. बुलडाणा याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मजला वैदर्भ छापखान्यांतून ता. २२।५।९७ ची नोटीस दिली ती आह्मास तारीख १०।६।९७ रोजीं पावली त्यास आज १३ दिवस झाले त्या नोटीसींत तूं लिहिलेलें सर्व खोटें आहे तुझा चुलता माझे येथें तुझ्या भेटीस आला त्याच्या माग लागून तूं मजला न कळतां पळून गेलीस त्या वेळेस तुझ्या आंगावर डागीने रुपये अजमासे शंभरचे घेऊन गेलीस व तुझा बहनोई कृष्णाजी याचे घरीं गेलीस व पुढें संशयित होऊन बहनोई नामें कृष्णा याजला घेऊन तूं आलीस तेव्हां तशा दशेंत आह्मी तुजला ठेऊन घेतलें नाहीं. लागलींच परत केली. कारण जाती धर्मा प्रमाणें तूं माझ्या मनानें राहिली नाहींस. विनाकारण तू माझे वरसंसाराची खराबी करून तूं आपलें नुकसान केलें. याज कारितां तुजला माझे जवळून सुटका करून घेणें आहे तर माझे लग्नास लागलेले रुपये अदमासे रुपये २०० लागले आहेत तर आतां ही नोटीस पावल्या पासून डागीन्याचें शंभर व लग्नाचे दोनशे असे एकूण रुपये ( ३०० ) तीनशे देऊन जावे व फारकती घ्यावी. त्यासिवाय ह्या नोटीसीचा खर्च द्यावा लागेल. सदरहू नोटीस पावले पासून पंधरा दिवसाचे आंत रुपये देऊन तूं मोकळे व्हावे कळावें तारीख १।७।९७.

सही
पामु व॥ रामजी माळी
रा॥ वाडी दस्तुर खुद्द

---

यवतमाळ ता. १७।६।९७

यवतमाळची हाल हवाल.

॥ आर्या ॥

एडिटर महाराज:—

॥वैदर्भ समाचारा मध्यें सदयें मिळेल पत्रास॥
॥ स्थान. अशी मी आशा, करितों. यानें
तुह्मा न हो त्रास ॥

मेघवृष्टी— मृग नक्षत्रारंभ झाल्यापासून आजपर्यंत सरासरी पाऊण इंच वृष्टी झाली असें उदक-मापक यंत्रावरून समजतें. पर्जन्य वृष्टीसमयीं चपलांचा कडकडाट व मेघांचा गडगडाट मुळींच नव्हता. या वरून मेघराजांची स्वारी सर्व आयुधांसह सज्ज नाहीं असें दिसतें. सर्व लोक चातक पक्षा प्रमाणें मेघांची वाटच पाहत आहेत. चालू लक्षणां वरून मेघ-वृष्टी लवकर होईल असें वाटत नाहीं.

अनाथ गृह— या गृहाची स्थापना होऊन आज तीन माहिने झाले. अनाथ लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मध्यंतरी बरीच कमी झाली होती मग ती कां हें समजलें नाहीं. आजपर्यंत या गृहाची स्थिती बरीच समाधानकारक होती परंतु अलिकडे ८-१९ दिवसांत थोडीशी असमाधानकारक झाली आहे असें प्रत्यक्ष पाहिल्या वरून व लोकांच्या सांगण्या वरून ह्मणावें लागतें. पूर्वीं लोकांस एक वेळच कां होईना, शिजलेलें अन्न पोटभर मिळत असे. परंतु हल्लीं लोकांच्या पात्रांवर एकदाच अन्न वाढतात. व तेंही प्राण-त्राणा पुरतेंच असतें. या स्थितीकडे अनाथगृह-व्यवस्थापक वेळेवर लक्ष पुरवितील तर बरें होईल. आज या गृहांतील लोकांची संख्या इतकी आहे. या गृहांतील अन्न-दानाची वेळ संध्याकाळची आहे.

मेजवान्यांची धामधूम—डिस्ट्रिक्ट फारेस्ट आफिसर मेहरबान मनसुखराय यांची बदली भरतपुरास नायब दिवाण व डिस्ट्रिक्ट फारेस्ट आफिसर या जाग्यांवर झाल्यामुळें ही मेजवान्यांची धामधूम आज सरासरी १९-२० दिवसां पासून सुरूं आहे. मेहरबान मनसुखराय यांस आज पर्यंत नऊ मेजवान्या झाल्या. या मेजवान्यांच्या धडाक्यांत किमानपक्ष १८० रुपयांचा चकाचूर उडाला असेल यात शंका नाहीं. हा आकडा मी केवळ अदमासानें दिला आहे. नक्की आकडा यापेक्षां बराच मोठा असला पाहिजे.

दाहाव्या मेजवानीचा समारंभ येथील 'सोशल क्लब' मध्यें आज रात्रीं होणार आहे. हा समारंभ विशेष प्रेक्षणीय होऊन आजपर्यंत झालेल्या मेजवान्या पेक्षां खर्च जास्त लागेल असा माझा अंदाज आहे. मेजवानी निमित्य पाक—निष्पत्ती करितां २ किंवा २॥ रुपये रोजानें मुद्दाम अमरावती नगरीहून बल्लवाचार्य आणिले आहेत. आजचा थाट कसा काय होईल तो प्रत्यक्ष पाहिल्यावर आपणास कळवीन.

आजपर्यंत झालेल्या सर्व मेजवान्या रात्रीं झाल्यामुळें दीपक—प्रकाशाची मोठी मजा दिसत असे. मेजवानीचे थाट २-३ ठिकाणीं मोठ मजेचे झाले. आमच्या येथील लोकप्रिय, शांत-स्वभावी व मन-मिळाऊ मेहेरबान दाजीसाहेब काळीकर तहशीलदार यांजकडील थाट तर खरोखर फारच प्रेक्षणीय होता. मेहरबान काळीकर यांनीं आपल्या लहानशा आंगण्यांत छोटासा मंडप उभारून त्याला, निशिगंध—पुष्पवत् शुभ्र-वस्त्राचें छत दिलें होतें. त्या शुभ्रछताला रंगी बेरंगी कांचेचे गोळे लाविले होते. मधून मधून हांड्या लाविल्यामुळें मंडपाला अवलोकनार्ह अशी शोभा आली होती. मंडपस्तंभ आम्र पल्लवांनीं वेष्टिले होते, ते पहाणारास असा भास होई, कीं नूतन लतांनीं आलिंगन दिलेले जणू हे स्वयंभू वृक्षच आहेत कीं काय. रस्त्याकडील गृहाचा दरवाजा व मंडपांत प्रवेश करावयाचा मुख्य दरवाजा यांना आम्रपल्लववेष्टित भव्य कमान देऊन दोन्ही बाजूस कर्दळी—स्तंभ लाविले होते.

आम्रपल्लव वेष्टित कमानी, आणि हंड्या व कांचेचे गोळे हे मंद मंद प्रभंजनाच्या स्पर्शानें अंदोलन पावत होते; व हा देखावा मोठा नेत्राल्हादजनक होता. व असा भास होत होता कीं हे आपल्या ग्रीवा तुकावून भोजनास्वाद घेण्याकरितां येणाऱ्या जन—समूहाचें जणूं मोठ्या आनंदानें स्वागत करीत आहेत.

स्टांड्स, वॉलशीट्स आणि चंद्रप्रकाश, दीप यांची, भोजन समयीं उत्तम व्यवस्थेशीर मांडणी केल्यामुळें प्रकाशानें सर्व मंडप-प्रदेश व्यापून टाकिला होता. इतकेंच नव्हे तर क्षणभर रवि-प्रकाशाचा विसर होत होता.

मेहरबान काळीकर यांच्या येथील या भोजन-प्रसंगीं एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी घडून आली. ती ही, कीं जे ह्मणून सुधारक-पक्षाचे आहेत, असा लोकांचा समज पूर्ण आहे, ती सर्व मंडळी एकाच पंक्तीला होती. आतां ही गोष्ट मेहेरबान काळीकर यांनींच मुद्दाम केली असेल असें ह्मणण्याला मुळींच जागा नाहीं. कारण रा. काळीकर हे कोणत्या प्रकारचे मनुष्य आहेत हें जो जाणतो तो असें ह्मणणार नाहीं. तेव्हां ही जी गोष्ट घडली ती स्वाभाविकपणें घडली; असा माझा समज आहे. असो.

आजपर्यंत झालेल्या मेजवान्या राजकीय थाटावरच झाल्या, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रत्येक मेजवानीला बहुत करून पंचवीस पासून ५० पर्यंत मंडळी असे.

आतां यापुढें, पाट कसें मांडले होते, रांगोळ्या कशा घातल्या, केळीचीं पानें होतीं किंवा पत्रावळी होत्या. पक्वान्न व शाखभाजा काय काय होत्या वगैरे हकीगत सांगत न बसतां इतकेंच सांगतो, कीं प्रत्येक ठिकाणची सर्व प्रकारची व्यवस्था उत्तम होती. असो.

भोजनास्वाद घेऊन आकंठ तृप्त झालेल्या लोकांस "आतापी भक्षितो येन वातापीच निपातित:" हा मंत्र ह्मणून शतपावली करण्याकारितां पाठवून देतो, व बराच लांबलेला मेजवानीचा भाग येथेंच आटपतो. आणि याच्याच दुसऱ्या भागा कडे वळतों.

मेजवान्यांची अवश्यकता होती कीं काय? असल्यास कितपत—या गोष्टीचा शांत मनानें व निष्पक्षपातानें विचार करणारा मनुष्य खात्रीनें आणि स्पष्टपणानें असें उत्तर देईल, कीं मेजवान्यांची कांहीं एक आवश्यकता नव्हती. इतकेंच ह्मणून तो राहणार नाहीं; केलेल्या मेजवान्या (२—३ खेरीज करून) केवळ गतानुगतिकत्वानें केल्या गेल्या. त्यांच्या अंगच्या गुणावर लुब्ध होऊन केल्या नाहींत; असेंही तो ह्मणेल. व असें ह्मणणारा सत्य-मार्गावलंबी आहे किंवा नाहीं हें आतां मी जें पुढें स्पष्टीकरण करणार आहे त्यावरून दिसून येईल.

( पुढें चालूं )

---

पुसद, ता० २४।६।९७

हवामान— मृग नक्षत्राचे दोन पाऊस बरे झाले. त्या नंतर ह्मणण्या सारखा पाऊस पडला नाहीं तरी उष्णतेचें मान कांहीं कमी झालें आहे. कांहीं ठिकाणीं कपाशीच्या पेरण्या झाल्या आहेत. या आठवड्यांत येथें व उमरखेड वगैरे ठिकाणीं हवेचा उपद्रव सुरूं झाला आहे.

डायमंड जुबिली-- ता. २१ व २२ या दोन दिवशीं येथें चक्रवर्तिनी महाराणी साहेबांचे राज्यारोहणास ६० वर्षे पूर्ण झालीं या बद्दल प्रजाधर्माप्रमाणें आनंद प्रदर्शित करण्या करितां मोठा उत्सव झाला. वर्गणीची रक्कम अगदीं बेताचींच ह्मणजे फक्त १०६ रुपये असतां तेवढ्यांत जीं कामें करण्यांत आलीं व शहरांत व्यवस्था ठेवण्यांत आली ती प्रेक्षणीय होती:— दोन दिवस नगरवासी लोकांनीं आपापले घरासमोर दीपोत्सव केला— लायब्ररी समोर व सर्व हिंदुमुसलमानांचीं देवळें यांत वर्गणीचे खर्चानें दीपोत्सव करण्यांत आला.

पहिले दिवशीं सकाळीं सर्व मंडळी मोठ्या उत्साहानें लायब्ररी समोर जमल्यावर स्वागत मंडळीनें त्यांस सत्कारानें मंडपांत ब-